रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक ३२ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ८ जुलै २०२४

किंमत ४ ₹




## तानसा नदीच्या पुरात मजूर अडकले



**वसई :** शहापूर परिसरात रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे वसई तालुक्यातील तानसा नदीला आलेल्या पुरात शेतात काम करणारे मजूर अडकले असल्याची घटना शिरसाड- वज्रेश्वरी रोडवरील उसगाव येथे घडली.उसगाव ग्रामपंचायत हद्दीत रविवारी सकाळी शेतमजूर काम करण्यासाठी शेतात गेले होते, मात्र अचानक शहापूर भागामध्ये मुसळधार पाऊस झाल्याने तानसा नदीच्या पाण्यात अचानक वाढ झाली. नदीला पुराच्या पाण्याचे स्वरूप आले, या पान २ वर

# दोन एसट्यांमध्ये भीषण अपघात

- ३२ प्रवासी जखमी
- आक्षी पुलाजवळील घटना



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील आक्षी-बेली जवळ दोन एसटी बसची समोरासमोर धडक झाली. या अपघातामध्ये एसटीतील चालक वाहक यांच्यासह ३२ प्रवासी जखमी झाले. यामध्ये दहा प्रवासी किरकोळ जखमी झाले असून त्यांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे.

उर्वरित २२ प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत. मुरुडकडून भांडुपकडे जाणाऱ्या एसटी बस चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने समोरून येणाऱ्या एसटी बसला जोरदार धडक बसली. त्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती अलिबाग पोलिसांनी दिली. ही घटना रविवारी सकाळी पावणेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. पान २ वर

## प्रवाशांना २१ हजार रुपयांची मदत

अलिबाग–रेवदंडा रस्त्यावर दोन एसटी बसचा अपघात झाला. या बसमध्ये सुमारे ३७ प्रवासी होते. झालेल्या भीषण अपघातात एसटीमधील २८ प्रवासी, दोन चालक व दोन प्रवासी असे एकूण ३२ जण जखमी झाले आहेत. २८ प्रवाशांपैकी एका प्रवाशाला किरकोळ दुखापत झाल्याने ते तेथून परस्पर त्यांच्याघरी गेले. त्यामुळे उर्वरित २७ प्रवाशांना उपचारासाठी तातडीची मदत म्हणून एसटी महामंडळाकडून सुमारे २१ हजार पाचशे रुपयांची आर्थिक मदत करण्यात आल्याची माहिती अलिबाग एसटी बस आगारातील स्थानक प्रमुख अभिजीत मांढरे यांनी दिली. मात्र उपचारासाठी झालेल्या खर्चाचे बिल कार्यालयास प्राप्त झाल्यावर उपचाराचा खर्च कार्यालयाकडून प्राप्त होईल असेही सांगण्यात आले आहे.

## डोंबिवली एमआयडीसीत शॉर्ट सर्किटमुळे डाईंग कंपनीला आग



**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

डोंबिवली एमआयडीसीतील स्फोटाने बेचिराख झालेल्या अमुदान कंपनी शेजारी असलेल्या असलेल्या न्यूओ ऑर्गेनिक डाईंग कंपनीला रविवारी दुपारी अचानक शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. आगीत डाईंगसाठी साठा करून ठेवण्यात आलेल्या पावडरच्या पिंपांना आग लागली. कंपनीतले कामगार आणि अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी पोहचल्याने आग तातडीने नियंत्रणात आणण्यात आली. आगीच्या या घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. डोंबिवली एमआयडीसीत पुन्हा स्फोट असे लघुसंदेश काही उतावीळ नेटकऱ्यांनी समाज माध्यमांवर व्हायरल केल्याने काही वेळ डोंबिवलीकरांच्या पान २ वर

### सोशल मीडियावर पुन्हा स्फोट झाल्याची अफवा






# किल्ले रायगडावर कचऱ्याचा ढीग

## राज्याभिषेक सोहळ्यानंतरची साफसफाई केवळ दिखावा

**। महाड । प्रतिनिधी ।**

**ऐतिहासिक किल्ले रायगडावर ६ जून आणि १९ जून रोजी तारीख आणि तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळे पार पडल्यानंतर गडावर जमा झालेला कचरा सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणेमार्फत संग्रहित केला होता मात्र हा कचरा रायगड रोप वे अप्पर स्टेशनच्या जवळच पडून आहे. या कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे.**



किल्ले रायगडावर ६ जून रोजी तारखेप्रमाणे आणि १९ - २० जून रोजी तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा पार पडला. या शिवराज्याभिषेक सोहळ्याकरता संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो शिवभक्तांनी हजेरी लावली होती. गडावर आलेल्या शिवभक्तांच्या विविध सुविधा किल्ले रायगडावर पुरवण्यासाठी प्रशासनामार्फत जय्यत तयारी देखील करण्यात आली होती. शिवभक्तांना लागणारे पिण्याचे पाणी पॅकिंग बाटलीद्वारे पुरवण्यात आले होते. हे पाणी प्यायल्यानंतर मोठ्या प्रमाणात रिकाम्या बाटल्या गडावर पडून होत्या. त्याचप्रमाणे गडावर भोजन व्यवस्था देखील करण्यात आली होती. हे भोजन वाटप करण्याकरता प्लास्टिकच्या पत्रावळ्या देण्यात आल्या होत्या. सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणेमार्फत हा कचरा दुसऱ्या दिवशी उचलण्यात आला. गडावर मोठ्या प्रमाणात साफसफाई करण्यात आली. प्लास्टिकच्या बॅगमधून हा कचरा रायगड रोपवे अप्पर स्टेशन जवळ आणून टाकण्यात आला आहे. शिवराज्याभिषेक सोहळे होऊन आज जवळपास अनेक दिवस उलटून गेले आहे मात्र अद्याप हा कचरा पडून राहिल्याने या ठिकाणी दुर्गंधी पसरत आहे. प्लास्टिक कचरा असल्याने गडावरील पर्यावरणात देखील धोका निर्माण होत आहे.

रायगड किल्ला पाहण्यासाठी आणि शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी गडावर दरवर्षी लाखो शिवभक्त आणि पर्यटक भेट देत असतात. गडाची देखभाल दुरुस्ती पुरातत्त्व विभागाच्या अंतर्गत येत असली तरी सध्या गडावरील संवर्धनाचे काम रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे गडावर रायगड प्राधिकरणाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र एकीकडे संवर्धन होत असताना दुसरीकडे पर्यटक आणि शिवप्रेमी यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक बाटल्यांचा वापर गडावर वाढला आहे. यामुळे शिवराज्याभिषेक सोहळा आणि इतर कार्यक्रमानंतर गडावर मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा जमा होत आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची आहे. मात्र स्थानिक प्रशासनाकडून याबाबत दुर्लक्ष केले आहे. नुकत्याच झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी पाणीपुरवठा आणि स्वच्छता करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर होती. मात्र जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रायगड रोपवे अप्पर स्टेशन येथे संग्रहित केलेला कचरा आजही उचलण्यात आलेला नाही.

> गडावर आलेल्या शिवभक्तांसाठी पाणीपुरवठा आणि स्वच्छता याबाबतची सर्व जबाबदारी रायगड जिल्हा परिषदेकडे होती. याबाबत माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.
> – ज्ञानोबा बाणापुरे, उपविभागीय अधिकारी महाड

> किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्यानंतर साफसफाई झालेली आहे मात्र संग्रहित केलेला कचरा विलेवाट न झाल्याने रायगड रोपवे जवळ तसाच पडून आहे. हा कचरा गडाखाली नेण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाने स्वीकारून त्याची विल्हेवाट लावली जावी
> – हर्षवर्धन पाटील शिवप्रेमी, पुणे



# उरण वीज कार्यालयावर धडक मोर्चा

**। उरण । वार्ताहर ।**

उरणमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे. याबाबत कल्पना देऊनही ठोस उपाययोजना होत नाही. त्याच्या निषेधार्थ उरण शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी वीज कार्यालयावर धडक देत जाब विचारला.

उरण परिसरात विजेचा लपंडाव व कर्मचारी वर्गाचा मुजोरपणा याचा त्रास येथील जनतेला सहन करावा लागत होता. मात्र वीज बिल भरमसाठ येत आहेत. त्याबाबत अनेकवेळा तक्रारी करूनही वीज मंडळाचे अधिकारी वर्ग दखल घेत नव्हते, यामुळे जनतेत वीज अधिकारी वर्गा विरोधात जनतेत संतापाची लाट पसरली होती.

याची दखल उरण शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षानी घेत जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली उरण वीज कार्यालयावर धडक देत याचा जाब विचारण्यात आला. यावेळी उरण शहरातील यार्ड व इतर आर्थिक लागेबांधे असलेल्या ठिकाणी वीज पुरवठा सुरळीत सुरू असल्याचा आरोप करीत सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप यावेळी अधिकारी वर्गावर करण्यात आला. तसेच पाऊस न पडता ही दिवसांतून अनेकवेळा वीज पुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावेळी कार्यकारी अभियंता धनंजय सातपुते व विजय सोनावले यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले.

# मुख्यमंत्र्यासाठी बनवलेल्या रस्त्यावर खड्डेच खड्डे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातून कर्जत खोपोली हा रस्ता पुण्याकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग समजला जातो. बहुसंख्य ठिकाणी काँक्रीटचा असलेल्या या रस्त्यावर अल्प ठिकाणी डांबरी रस्ता आहे. या रस्त्यावर केळवली परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रात्रीच्या वेळी या रस्त्याने प्रवास करणे धोकादायक बनले आहे. याच रस्त्याने राज्याचे मुख्यमंत्री कर्जत येथे आले होते आणि त्यावेळी मुख्यमंत्र्यांचे वाहनांसाठी हा रस्ता डांबरी केला होता.

कर्जत तालुक्यातून पुण्याकडे जाणारी वाहने कर्जत खोपोली रस्त्याने जात असतात. त्यात ठाणे जिल्ह्यातील वाहने आणि नाशिक जिल्ह्यातून येणारी वाहनेदेखील अलिबाग-पेण आणि कोकणात जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर करतात. मात्र, या रस्त्यावरील डांबरी भाग सध्या धोकादायक बनला आहे. रात्रीच्या वेळी तर या रस्त्याने वाहतूक करणाऱ्या दुचाकी वाहनधारक यांच्यासाठी हा रास्ता धोकादायक बनला आहे. रस्त्यावर मोठं मोठे खड्डे बनले असून रात्रीच्या वेळी वाहने रस्त्यातून जाताना हेड लाईटमुळे दुचाकी धारकांचा अपघात होत आहेत. याच रस्त्याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जानेवारी महिन्यात कर्जत शहारत आले होते. त्यावेळी कर्जत खोपोली रस्त्याची डागडुगी करण्यात आली होती. तर, डांबरी भाग नव्याने तयार करण्यात आला होता. आता त्याच डांबरी रस्त्याने भीषणरूप धारण केले असून दुचाकी यांच्यासाठी हा रस्ता धोकादायक बनला आहे.

## लॉजवरील जुगार अड्ड्यावर कारवाई

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील काळुंद्रे गावातील भिंगारीपाडा येथील डिंपल लॉजमध्ये पैसे लावून तीन पत्ती जुगार खेळणाऱ्यांवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

या ठिकाणी जुगार अड्डा सुरू असून तेथे काही लोक पैसे लावून जुगार खेळत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्यांच्या विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा मारुन ६ जणांना तीन पत्ती जुगार खेळताना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १४ हजार ४०० रुपयांची रक्कम हस्तगत केली आहे.

# नैनाविरोधातील उपोषण तात्पुरते स्थगित

**। पनवेल । प्रतिनिधी ।**




प्रभाव अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्पग्रस्त मागील दोन वर्षांपासून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन करत आहेत. नुकतेच दि.१ रोजी गावठाण विस्तार हक्क समितीचे अध्यक्ष अनिल ढवळे यांनी सीबीडी बेलापुर याठिकाणी रेल्वे स्टेशन टॉवर क्रमांक १० या नैना प्राधिकरणाच्या कार्यालयाखाली बेमुदत उपोषण छेडले होते.मात्र ढवळे यांची प्रकृती खालावल्याने त्यांनी उपोषणाला स्थगिती दिली.

मागील सहा दिवसांपासून हे बेमुदत उपोषण सुरु होते. या उपोषणाला ९५ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकुर यांनी पाठिंबा दर्शवला होता. नैना प्रकल्पबाधित शेतजमीन मालकांना ४० टक्के विकसित भूखंड आणि त्या भूखंडावर इमारत बांधल्यास विकास शुल्क नैना प्राधिकरणाला भरावे लागणार आहे.प्रत्येक भूखंडाचा विकास करण्यासाठी वास्तुरचनाकार शिवाय नैनाने पर्याय ठेवला नसल्याने बांधकाम परवानगीसाठी टेबलाखालून चौरस फुटामागे लाखो रुपये भरणे शक्य नसल्याने शेतकऱ्यांनी नैना प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे.

विमानतळ परिसराचा सुनियोजित विकास व्हावा यादृष्टीने हा प्रकल्प स्थानिक शेतकऱ्यांवर लादला गेला आहे.असे असले तरी या प्रकल्पात स्थानिकांची हित जोपासले गेले नाही.

दरम्यान अनिल ढवळे यांची खालावलेली प्रकृती पाहता सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीधर गोरे यांनी देखील ढवळे यांना उपोषण स्थगित करण्यास सांगितल्यावर त्यांनी उपोषण मागे घेतले.

## आदई पाण्याखाली, घरांमध्ये शिरले पाणी

**पनवेल :** पहिल्याच झालेल्या मुसळधार पावसात पाण्याखाली गेलेले आहे. आदई गावात अनेक इमारतींची कामे सुरु आहेत. इमारती बांधताना पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात न आल्याचा फटका नागरिकांना बसत असल्याचे नागरिक बोलत आहेत.

रविवारी पहाटेपासून पडत असलेल्या पावसामुळे नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली आहे. अनेक ठिकानी पाणी साचलेले आहे. आदई येथील काही ठिकाणच्या रस्त्यावर गुडघ्याच्या वर पाणी साचल्याने गाड्या अर्ध्या पाण्याखाली गेल्या आहेत. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

# पावसाच्या पाण्याने कळंबोली जलमय

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शनिवारी मध्यरात्रीपासुन सुरु असलेल्या जोरदार पावसाचा सर्वात जास्त परिणाम कळंबोली शहरात पहावयास मिळाला. रविवार दि.७ रोजी सकाळी ८ च्या सुमारास कळंबोली शहरात पाणी साचण्यास सुरुवात झाली. अनेक नागरिकांच्या घरात देखील पाणी शिरले तसेच रस्त्यावर पार्क केलेल्या दुचाकी व चारचाकी पाण्याखाली गेल्या होत्या. त्यात समुद्रात भरती असल्याने पाण्याचा निचरा योग्य रित्या होऊ शकला नाही. त्यामुळे कळंबोली शहरात अनेक भागात पाणी साचले.

काही घरात देखील पाणी शिरल्याने नागरिकांची तारांबळ उडाल. कळंबोली मधील मुख्य रस्ता पाण्याखाली गेल्याने या मार्गावर एनएमएमटी,बेस्ट च्या बस बंद पडल्या याचाच परिणाम वाहतुकीवर झाला. बस बंद पडल्याने या रस्त्यावरील चार चाकी गाड्या देखील पाण्यात अडकल्या.शहरात ५० दुचाकी, २५ चारचाकी पाण्याखाली गेल्याने वाहनांचे मोठे नुकसान झाले. पावसाचा जोर १२ च्या सुमारास कमी होत गेल्याने साचलेले पाणी हळू हळू ओसरले.दरम्यान शहरात अर्धवट नालेसफाई व पावसाळ्याच्या तोंडावर हाती घेतलेल्या विकासकामांमुळे हि परिस्थिती ओढवली असल्याचा आरोप शेकापचे माजी नगरसेवक रवींद्र भगत यांनी केला.सत्ताधारी भाजपवर भगत यांनी यावेळी आरोप केले.

> चार ते पाच तासातच १२१ मिमी पाऊस पनवेल परिसरात पडले. त्यातच समुद्राला भरती असल्याने पाण्याचा निचरा होऊ शकला नसल्याने कळंबोलीत ही समस्या उद्भवली. मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे व्यवस्थितरित्या पूर्ण करण्यात आली आहेत. होल्डिंग पॉण्डची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने गाळ काढण्यात येईल.
> – मंगेश चितळे (आयुक्त,पनवेल महानगरपालिका)

# भारताला विश्वगुरूचे स्थान प्राप्त व्हावे: डॉ. भोसले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरुड हिंदू एज्युकेशन सोसायटी व भोसला मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे समान उद्दिष्ट असुन शैक्षणिक क्षेत्राच्या मध्यमातून संस्कारक्षम माणूस व सशक्त समाज घडवुन या भारत भूमीला विश्वगुरु चे स्थान प्राप्त व्हावे असे प्रतिपादन माजी एअर मार्शल डॉ.अजित भोसले यांनी केले.

मुरुड येथील माळी समाज सभागृहात आयोजित ओंकार विद्या मंदिर-कनिष्ठ महाविद्यालयत इयत्ता ११ वी च्या विज्ञान शाखेचे उद्घाटन सोहळ्यात विद्यार्थी -पालक वर्गास मार्गदर्शन करताना ते बोलत होते. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केवळ हुशारी नाही तर चाणाक्ष ही राहिले पाहिजे. परशुरामाच्या या कोकण भूमीत चिकाटी, संयम आणि सर्मपण हा स्थायीभाव अधोरखित करण्यायोग्य आहे.

यावेळी व्यासपीठावर सरखेल कान्होजी आंग्रे याचे वंशज रघुजीराजे आंग्रे, ॲड. अविनाश भिडे, हेमंत देशपांडे, संजय पगारे, मनोहर गुरव, सुनील विरकुड, दीपाली जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवडमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा उच्छाद

**। पिंपरी । वृत्तसंस्था ।**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पासपोर्ट विभागाकडून अनधिकृत राहत असलेल्या बांगलादेशींकडून बनावट कागदपत्राच्या आधारे मिळवलेले तब्बल ४२ भारतीय पासपोर्ट रद्द करण्यात आले आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील दहशतवाद विरोधी पथक आणि निगडी पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत जानेवारी महिन्यात निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनाधिकृतरित्या वास्तव्य करत असणाऱ्या ५ बांगलादेशी घुसखोर राहत असल्याची माहिती मिळाली होती.

## ■ तब्बल ४२ भारतीय पासपोर्ट रद्द!

यानंतर त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्या ५ बांगलादेशी नागरिकांना ज्या एजंटने पासपोर्ट बनवण्यासाठी मदत केली त्याची सुद्धा सखोल चौकशी करण्यात आली. यामध्ये त्या एजंटने आणखी ३५ बांगलादेशी घुसखोरांना भारतीय पासपोर्ट मिळवून दिला असल्याचं समोर आलं आहे. संबंधित एजंटसह सर्व ४२ बांगलादेशी घुसखोरांविरोधात जानेवारी महिन्यात निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा शोध घेतला असता त्या ५ बांगलादेशी नागरिकांना एका एजंटने बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट बनवून दिला असल्याचे पोलीस तपासात समोर आलं. त्यानंतर दहशतवादी विरोधी पथक, निगडी पोलीस पासपोर्ट विभाग यांच्या संयुक्त कारवाईमध्ये ज्या एजंटकडून हे पासपोर्ट बनवले गेले ते ४२ पासपोर्ट रद्द करण्याची कारवाई करण्यात आली.

हे घुसखोर भारत-बांगलादेश बॉर्डरवरून भारतात प्रवेश केल्यानंतर ते त्या ठिकाणी असणाऱ्या बॉर्डरवर असणाऱ्या जिल्ह्यातील बनावट शाळा सोडल्याचा दाखला, डोमीसाईल इत्यादी कागदपत्रे बनवत आणि त्या कागदपत्राच्या आधारे ओरिजनल आधारकार्ड, पॅनकार्ड बनवून घेत आणि त्यानंतर ते घुसखोर या ओरिजनल आधारकार्ड आणि पॅनकार्डच्या आधारावर पासपोर्ट बनवून घेत होते.

# शेलू स्थानकात लावलेले बॅरीगेट्स

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शेलू स्थानकावरील कर्जत दिशेकडील बाजूस रेल्वे प्रशासनाने लोखंडी बेरिगेट्स उभारल्या आहेत. त्यामुळे शेलू स्थानकातून बांधीवली गावाकडे जाणाऱ्या लोकांना घरी परतणार अवघड झाले आहे.त्यामुळे त्या ठिकाणी लावण्यात आलेले बॅरिगेटस हटविण्याची मागणी माजी सरपंच शिवाजी खारीक यांनी केली आहे.

मध्य रेल्वेच्या मेन लाईन वरील शेलू स्थानकावरील फलाट क्रमांक एकच्या कर्जत दिशेकडील असणाऱ्या पादचारी पायऱ्या बंद करून तिथे रेल्वे प्रशासनाकडून लोखंडी बेरिगेट्स लावण्यात आले आहेत. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होऊ लागली आहे त्यामुळे स्थानिक ग्रामपंचायत माजी सरपंच शिवाजी खारीक आणि प्रवाशांनी हे बॅरीगेट हटवून जिन्याकडून येणारा रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली आहे.मध्य रेल्वेच्या कल्याण कर्जत मार्गांवर शेलू रेल्वे स्थानक आहे.या स्थानकावर दररोज सुमारे चार ते पाच हजार नागरिक प्रवास करत असतात. शेलू, बांधिवली, दामत, भडवल, तसेच निकोप मोहिली मानिवली अवसरे या गावातील चाकरमानी रोज शेलू स्थानाकावरून कामाच्या ठिकाणी जात असतात. शेलू स्थानकावरील फलाट क्रमांक एकच्या नेरळ दिशेकडील बाजूस रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी जिना तयार करण्यात आला आहे.तसेच याच दिशेला लिफ्टदेखील तयार आहे.

प्रवाशांनी जिना उतरल्यानंतर स्थानकामधून बाहेर पडण्यासाठी असणारा जुना रस्ता बंद करण्यात आला आहे.

## पान १ वरून

पान १ वरून

### दोन एसट्यांमध्ये भीषण अपघात

माहितीनुसार मुरुड आगारातून सकाळी सहा वाजता भांडुपकडे जाणारी एसटी बस घेऊन चालक निघाला. अलिबागकडे येत असताना आक्षी पुलाकडील वळणाजवळ आल्यावर रेवदंड्याकडे जाणाऱ्या एसटी बसला समोरासमोर धडक लागली. या भीषण अपघातात बसमधील समोरील भागाचे प्रचंड नुकसान झाले. या अपघाताची बातमी वाऱ्यासारखी पसरतात आक्षी नागावसह परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. अलिबाग पोलीस ठाण्यातील बीट मार्शल पथकाचे पोलीस हवालदार साठे यांनी देखील घटनास्थळी आले. स्थानिकांच्या मदतीने जखमींना बसमधून बाहेर काढून त्यांना अधिक उपचारासाठी अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आले. एसटी चालकाचा पाय अडकला होता. स्थानिकांनी जीवाची बाजी लावत चालकाला गाडीतून सुखरूप काढले. मात्र त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातामध्ये एकूण ३२ प्रवासी जखमी झाल्याची माहिती अलिबाग पोलिसांनी दिली. दहा जणांना किरकोळ दुखापत झाली असून २२ जण अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहेत. या अपघाताची माहिती एसटी महामंडळातील अलिबाग आगार व्यवस्थापन विभागाला कळताच त्यांच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी आणि रुग्णालयात जाऊन पाहणी केली. जखमी प्रवाशांना तात्काळ मदतीचा हात देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

### डोंबिवली एमआयडीसीत शॉर्ट सर्किटमुळे डाईंग कंपनीला आग

पोटात गोळाच आला होता. पण ही आग कंपनीतील स्फोटामुळे नाही तर ती शॉर्ट सर्किटमुळे लागली आहे. ती तातडीने नियंत्रणात आणली गेल्याची माहितीही अग्निशमन दलाने दिली आहे.एमआयडीसी विभाग दोनमध्ये न्युओ ऑर्गेनिक डाईंग कंपनी आहे. कंपनीच्या बाहेरील महावितरणचा रोहित्रावर सकाळपासून दोन ते तीन वेळ शॉर्ट सर्किट झाले होते. त्यामुळे कंपनीतील वीज पुरवठा कमी जास्त होऊन, त्याचा परिणाम वीज दबाव कमी, जास्त होण्यावर होत होता. रविवारी दुपारी अशाच प्रकारे रोहित्रावर जोरदार आवाज होऊन त्याचा परिणाम कंपनीतील वीज दाब अचानक वाढला. त्यामुळे कंपनीत शॉर्ट सर्किट झाले. या उच्च दाबाने कंपनीतील वीज वाहक तारांनी तात्काळ पेट घेतला. ही आग वीज वाहिन्यांजवळ डाईंगसाठी आणलेल्या आणि साठा करून ठेवलेल्या पिंपांना लागताच पावडर असलेल्या पिंपांनी पेट घेतला. याठिकाणी काम करत असलेल्या कामगारांनी तातडीने प्रतिबंधक उपाय करून आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. तसंच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविले.आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही, असे कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर्सचे असोसिएशनचे माजी अध्यक्ष देवेन सोनी यांनी स्पष्ट केलं.

### तानसा नदीच्या पुरात मजूर अडकले

पुराच्या पाण्यात शेतात गेलेले मजूर अडकले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार राजेश पाटील यांनी तत्काळ एनडीआरएफ व महापालिका अग्निशमन दल, महसूल विभाग व मांडवी पोलिस यांना या घटनेची माहिती दिली. या बचाव मोहिमेत एनडीआरएफच्या जवानांनी बचाव कार्याची मोहीम हाती घेतली. अडीच ते तीन तासांनी दुपारी अडीचच्या सुमारास बचाव कार्य थांबविण्यात आले. पाण्यात अडकलेल्या १६ मजुरांची सुटका केली. यामध्ये ९ महिला, ७ पुरुष, दोन लहान मुलेही आहेत.तानसा नदीला अचानक पूर आल्याने नदी किनाऱ्यावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मात्र तानसा नदीत चांदीप येथे मुंबई-बडोदा महामार्ग बनवण्यासाठी बांध टाकला असून यामुळे तानसा नदीत पाण्याचा निचरा कमी होत असल्याने हा पूर आल्याचे या भागातील नागरिकांचे म्हणणे आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे.
मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८

■ Wanted : Teachers, Office Assistants and Typists. Contact: Sindhu Teacher's Classes, 2nd Floor, Vishnu Mandir, Opposite Old Municipal Office, Alibag. Phone Numbers: 9422383196,8551042000, 8551052000.

■ अलिबाग मधिल ऑफिस करिता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन,आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# औषधांची नशा, तरुणांची दुर्दशा

## सामाजिक आजारपण फोफावण्याची तज्ज्ञांना भीती

। आविष्कार देसाई ।
। रायगड ।

**अमली पदार्थांची तस्करी आणि वापर करण्याबाबत अमली विरोधी पथकाने कडक पावले उचलली आहेत. नशा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध पदार्थांवर निर्बंध आले आहेत. आता नशा कोणत्या पदार्थाने करायची याचे उत्तर नशेड्यांनी शोधून काढले आहे. औषधांच्या दुकानात सहज उपलब्ध होणारे औषध म्हणजे खोकल्याचे औषध होय. या औषधांचा वापर नशा करणासाठी सध्या केला जात असल्याने सामाजिक आजारपण निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या औषधांचे अधिक सेवन हे आरोग्यासाठी हानिकरक ठरत आहे.**

नशा करून आपल्याच विश्वात रमणारे सध्या खोकल्याच्या औषधांवर आपली नशा भागवत आहेत. खोकल्याचे औषध कोणत्याही मेडिकलच्या दुकानामध्ये प्रिस्क्रिप्शनशिवाय सहज मिळते. त्यामुळे काही मेडिकलच्या दुकानामध्ये सर्वात जास्त खोकल्याच्या औषधांची विक्री होते. कोडीन नावाचा घटक द्रव्य त्यामध्ये असतो. त्याचे अधिक सेवन केल्यास नशा येते. आता तर ही गोष्ट सर्वांनाच माहीत झालेली आहे. शाळा-कॉलेजात जाणारे अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी खोकल्याच्या औषधांचा वापर नशा आणणाऱ्या पदार्थासारखा करायला लागले आहेत. याचे अतिसेवन केल्याने शरीरावर दुष्परिणाम होतात.

केमिस्टकडे खोकल्याच्या औषधांचा (कफ सिरप) खपही वाढल्याचे बोलले जाते. हा खप वाढण्यामागे नेमके सर्दी-खोकला हेच कारण नसून, याचा औषध म्हणून कमी तर नशेसाठी अधिक वापर होत असल्याचे चित्र आहे. नशेड्यांसह उच्चभ्रू तरुणांमध्ये खोकल्याच्या औषधांची मागणी वाढली असून, विविध सेलिब्रेशनच्या पार्ट्यांमध्येही याचा वापर होत असल्याचे आता लपलेले नाही.

कोडीनमुळे त्या व्यक्तीच्या मेंदूवर गंभीर परिणाम होतात. हे माहीत असूनसुद्धा कोडीनग्रस्त लोक वरचेवर त्याचे सेवन करत राहतात. एखाद्या दारूच्या दुकानात जाऊन दारूची बाटली खरेदी करण्यापेक्षा औषधाच्या दुकानात जाऊन खोकल्याचे औषध खरेदी करणे सोपे असते. परंतु, औषधाचे दुकानदार आता सावध झालेले आहेत. एखादी व्यक्ती सातत्याने खोकल्याचे औषध खरेदी करायला लागली की दुकानदारही औषधाची मागणी औषध म्हणून नसून, ती नशा करण्यासाठी आहे हे आता ओळखायला लागले आहेत. त्यामुळे अशा विक्रीवर हळूहळू चेक बसत आहे.



खोकल्याच्या औषधामध्ये कोडीन नावाचे घटक द्रव्य असते. त्यामुळे त्याचे जास्त सेवन केल्यास नशा येते. खोकल्याचे औषध हे अन्य नशा करणाऱ्या पदार्थांपेक्षा तुलनेत स्वस्त मिळते. त्यामुळे याची जास्त नशा केल्याने शरीर आणि मेंदूवर संतुलन राहात नाही. नशेची सवय झाल्याने नशा करण्यास मिळाली नाही, तर ते हिंसक अथवा त्यांच्या हातून गुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. खोकल्याचे औषध हे अन्य नशा करणाऱ्या पदार्थांपेक्षा तुलनेने स्वस्त मिळते. प्रिस्क्रिप्शन शिवाय सहज उपलब्ध होत असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. खोकल्याच्या औषधांचे अतिसेवन ही नशा आहे. याची माहिती पालकांना असतेच असे नाही. तसेच दारू किंवा ड्रग्जप्रमाणे दुर्गंधी येत नाही. त्यामुळे खोकला आहे असे सांगून पालकांची फसवणूक करण्याचे प्रकार घडतात. या अतिसेवन केल्याने जीवावरही बेतू शकते.

> नशा करण्यासाठी विविध औषधांचा वापर करण्यात येतो. नशा करणाऱ्यांना सातत्याने नशा करण्याची सवय लागलेली असते. त्यांना नशा करण्यास मिळाली नाही, तर बेचेन होतात. यासाठी खोकल्याची औषध नशा करण्यासाठी वापरली जातात. तरुण पिढीला बरबादीपासून रोखायचे असेल तर, त्यांचे समुपदेशन होणे गरजेचे आहे. तसेच औषध दुकानदारांनी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे देऊ नये. पालकांनीही आपल्या मुलांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
> - डॉ. आंबादास देवमाने, जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड

> तरुण पिढी आपल्या देशाची ताकद आहे. त्यांच्यावर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे. पालक आणि पाल्य यांच्यातील संवाद तुटत चालला आहे. युवक व्यसनाच्या आहारी गेल्यास देशाचे भवितव्य अंधकारमय आहे. १६ ते ३० या वयोगटात अशा व्यसनाचे प्रमाण दिसून येते. यातून सामाजिक आजारपण फोफावण्याचा अधिक धोका आहे. व्यसनाधिनता रोखण्यासाठी सर्वांनी एक मिशन म्हणून काम करणे गजेचे आहे.
> - शीतल कांबळे, समुपदेशक



## आमदार जयंत पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांचा रविवारी वाढदिवस असल्याने त्यांना राजकीय, सामाजिक, सहकार, क्रीडा व अन्य क्षेत्रातील मान्यवरांनी भ्रमणध्वनीवरून अभिष्टचिंतनाच्या शुभेच्छा दिल्या.

वाढदिवस जल्लोषात साजरा करणार नसल्याने शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची निराशा झाली होती. परंतु आपल्या खंबीर नेतृत्वाला निरोगी दीर्घायुष्य लाभावे यासाठी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी जागोजागी आमदार जयंत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे जाहिरातफलक लावले होते. राज्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात आमदार जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

आमदार जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पीएनपी शैक्षणिक संकुलात एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रभाकरंडक या नावाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेला ग्रामीण कलाकारांना संधी देण्यात आली होती. महाविद्यालयाच्या सभागृहात या स्पर्धेला ५० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

## कर्जत-कल्याण राज्य मार्गाची दूरवस्था

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत-कल्याण या राज्य मार्गावरील नेरळ परिसरात राज्य मार्गाची दूरअवस्था झाली आहे. रस्त्यावरून डांबरीकरण करण्यात आल्यानंतर आता या रस्त्यावरील डांबर वाहून गेले असून नुसती खडी शिल्लक राहिल्याने या राज्य मार्गावरून प्रवास करणे मोठे धोक्याचे बनले आहे. सध्या या राज्य मार्गावर मोटारसायकलला अपघात घडतात तर मोठी चारचाकी वाहने स्लिप होत आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने याची दखल घेत उपाय योजना करावी, अन्यथा येथे मोठी दुर्घटना घेडेल असे सांगण्यात येत आहे. रस्त्याच्या कामात नियोजनाचा अभाव असून अद्याप या रस्त्याचे काम ठिकठिकाणी अर्धवट असल्याने तसेच सूचना फलकाचे अभाव यामुळे अपघाताची मालिका सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मान्सून सुरू होण्याच्या काही दिवस आधी ह्या रस्त्याच्या ठेकेदाराकडून रस्त्यावर डाग डुजी करण्यात आली होती. रात्रीच्या वेळात मोटारसायकल चालक येथे अपघात घडत असून मोठी वाहने वळणावर स्लिप होत अहेत. त्यामुळे पुढे एखादा मोठा अपघात होण्याची भीती देखील वर्तवण्यात येत आहे.

## ३८ वर्षीय इसम बेपत्ता

। पनवेल । वार्ताहर ।

देवद येथे राहणारा ३८ वर्षीय रामनाथ सुदाम मेंदारकर हॉस्पिटलमध्ये जाऊन येतो असे सांगून बाहेर गेला आणि तो घरी परत न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार खान्देश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्याची उंची पाच फूट, रंग गोरा, केस काळे आहेत. अंगाने मध्यम असून अंगात सफेद रंगाचा चौकडी शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट घातली आहे. दाढी साधारण वाढलेली असून पायात चॉकलेटी रंगाची सँडल आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक फौजदार सुभाष मिस्त्री यांच्याशी संपर्क साधावा.

## अलिबागमध्ये आल्या पंचरंगी चेतक

## नमिता मोटर्स मार्फत विक्रीसाठी दाखल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जगामध्ये प्रसिध्द असलेल्या चेतक कंपनीच्या २९०१ ब्लू लाईन या पंचरंगी इलेक्ट्रीक दुचाकी दाखल झाल्या आहेत. अलिबाग येथील नमिता मोटर्समध्ये या दुचाकी विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आल्या असून त्यांचा शुभारंभ शनिवारी (दि.६) सायंकाळी व्यावसायिक विश्वास म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.



नमिता मोटर्सचे पार्टनर माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्याकडून या कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच, पार्टनर शैलेश नाईक यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला. दरम्यान, या नव्याने दाखल झालेल्या दुचाकी पाहण्यासाठी ग्राहकांनी नमिता मोटर्समध्ये प्रचंड गर्दी केली होती.

यावेळी व्यवस्थापक श्रध्दा जाधव, नमिता मोटर्सचे कर्मचारी व शंभरहून अधिक नागरिक उपस्थित होते. २९०१ ब्लू लाईन ही दुचाकी आगळ्या वेगळ्या रंगात व रुपात उपलब्ध आहेत. यात सायबर व्हाईट, रेड, ब्लॅक, लाईम यल्लो, अजूर ब्लू या पाच रंगाच्या दुचाकी अलिबाग येथील नमिता मोटर्समध्ये उपलब्ध आहेत.

अलिबाग, पेण, रोहा परिसरातील असंख्य ग्राहकांनी या नव्या दुचाकीची खरेदी केली आहे. तसेच, २९०१ ब्लू लाईन ही नवीन दुचाकी खरेदी करण्याचा पहिला मान अलिबागमधील ग्राहक शैलेश मराठे यांना मिळाला असल्याचे नाईक यांनी सांगितले आहे.

या दुचाकीची रेंज १२३ किलोमीटर असून वेग ताशी ६३ किलोमीटर इतका आहे. तसेच, या दुचाकीला तीन वर्षे वॉरंटी, स्टील बॉडी, सहा तासात शंभर टक्के चार्जिंग, ड्रम ब्रेक, मर्यादीत ॲप कनेक्टीव्हीटी असून या दुचाकीची किंमत सुमारे एक लाख रुपये इतकी आहे. २९०१ ब्लू लाईन दुचाकी खरेदी करण्यासाठी बजाज फायनान्सची व्यवस्था असून www.chetak.com या लिंकवर दुचाकी बुकींगची सोय केली असल्याचे शैलेश नाईक यांनी सांगितले आहे.



**रात्रभर पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे सायन-पनवेल महामार्गावरील कळंबोली येथे मोठ्या प्रमाणावर पाणी भरल्याने वाहन चालकांना वाहन चालविताना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. तसेच, नवी मुंबई महानगर पालिका बससेवा रस्त्याच्या मधोमध बंद पडली होती.**

## पनवेलमध्ये १७ वर्षीय मुलाचे अपहरण

**पनवेल :** १७ वर्षीय मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १७ वर्षीय समर याला पित्ताचा त्रास असल्याने तो आठवड्यापासून पनवेलला आयुर्वेदिक डॉक्टरांकडे ट्रेनने जात प्रवास करत असे. ३ जुलै रोजी डॉक्टरांनी समरला पनवेल स्टेशनला सायंकाळी ६ वाजता सोडले. यावेळी ट्रेन ने येतो असे त्याने आईला फोन करून सांगितले. त्यानंतर रात्री पावणेदहा वाजता डॉक्टरांना समर बाबत विचारले असता त्यांनी पनवेल स्टेशनला सोडले असल्याचे सांगितले. त्यावेळी समरचा फोन बंद होता. त्यानंतर समरचा इतरत्र शोध घेतला. मात्र, तो सापडून आला नाही. अनोळखी इसमाने त्याचे अपहरण केले.

## कर्जत तालुक्यात तुफानी पाऊस

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात गेली दोन दिवस पावसाने जोरदार बॅटिंग करीत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. माथेरानमध्ये सुद्धा पावसाने जोरदार हजेरी लावली असून येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर, नेरळ-कळंब मार्गावरील दहिवली मालेगाव पुल पाण्याखाली गेला आहे.

कर्जत तालुक्यात शनिवारी (दि.६) दिवसभर पाऊस सुरू असून रात्री विजांचा कडकडाट देखील सुरू होता. त्यामुळे उल्हास नदीला देखील पूर आला आहे. या वर्षीच्या पावसाळ्यातील हा पहिला पूर आला असून उल्हास नदीवरील नेरळ-कळंब रस्त्यावरील मालेगाव दहिवली येथील पुल पाण्याखाली गेला आहे. पुल पाण्याखाली गेल्याने मोठ्या प्रमाणावर कचरा अडकून पडला असून दहिवली आणि मालेगाव मधील तरुणांनी एकत्र येत येथील कचरा बाजूला करण्याचे काम केले.

कर्जत तालुक्यात रविवारी ११५ मिली पावसाची नोंद झाली असून तालुक्यात आता पर्यंत ७९३ मिली पावसाची नोंद झाली आहे. गतवर्षी ३३९७ मिली पाऊस झाला होता. मात्र, या पावसामुळे तालुक्यातील शेतीच्या कामांची लगबग वाढली आहे.



## मुरूडमध्ये भातलावणीला वेग



। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

मुरूड तालुक्यासह ग्रामीण भागात पावसाने दमदार हजेरी लावल्याने भात शेती कामाला वेग आला असल्याचे चित्र दिसून येत आहे. तालुक्यातील शिघ्रे, नागशेत, सायगाव, उंडरगाव, खारआंबोली, वावे, उसरोली, मजगाव, वालवटी, आदाड पंचक्रोशीत भात लावणी सुरू झाल्या आहेत.

यावेळी शिघ्रे येथील शेतकरी रघुनाथ माळी आणि नागशेत-पारगान येथील शेतकरी धर्माजी हिरवे यांनी बोलताना सांगितले की, शनिवारी रात्री पासून तालुक्यात जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतात लावणी योग्य पाणी साचल्याने तालुक्यात पारंपारिक पद्धतीने भात लावणी सुरू करण्यात आली आहे.

यावेळी तालुक्यात मजुरीने माणसे घेऊन शेतीची कामे जोरकसपणे सुरू आहेत. पावसाचा अनियमितपणा असला तरी आता पावसामुळे शेत जमिनीत पाणी असल्याने लावणीला वेग वाढला आहे. पाणथळ जमिनीवर तर अधिक वेगाने लावणीची कामे सुरू आहेत, असे चित्र दिसत आहे. पावसाची अजूनही गरज असून त्यावरच भात शेतीची मदार आहे. येथील भात पीक हे मुख्य पीक आहे. तालुक्यात ३ हजार हेक्टर जमिनीवर भात शेती केली जाते. ताल्युक्यात रविवारपर्यंत सुमारे ७५० मिमी पाऊस पडल्याची माहिती मुरूड तहसील यांनी दिली आहे.

### सरकारच्या उदासीन धोरणाचा फटका

# सुदृढ आरोग्य व्यवस्थेचे प्रकल्प रखडले

। रायगड । खास प्रतिनिधी ।

**रायगड जिल्हा हा देशाच्या आर्थिक राजधानीला खेटून असणारा जिल्हा आहे. तरीदेखील रायगड जिल्ह्यामधील आरोग्य व्यवस्था अजिबात चांगली नाही. जनतेला अत्याधुनिक आणि सुसज्ज अशी आरोग्य सुविधा देण्याबाबत सरकार कायमच उदासीन असल्याचे दिसते. दोन वर्षांपूर्वी रोहा-कोलाड येथे महिला रुग्णालय उभारण्याचे जाहीर करण्यात आले होते, तसेच महाड येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, उरण, महाड येथे उपजिल्हा रुग्णालयायची इमारत नव्याने बांधण्याचे नियोजन होते. मंजुरी मिळूनदेखील सरकारच्या उदासीन धोरणामुळे आरोग्य व्यवस्था सुधारणारे प्रकल्प रखडल्याचे चित्र आहे.**

जिल्ह्यामध्ये पूर्वी शेती आणि मासेमारी हेच प्रमुख रोजगाराचे साधन होते. कालांतराने उदारीकरणाच्या धोरणानंतर आपल्याकडे प्रकल्पाचे वारे वाहू लागले. शेतीची जागा विविध प्रकल्पांनी घेतली. जिल्ह्यात प्रमुख ठिकाणी प्रकल्पाचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे नागरीकरण आणि शहरीकरण हे दिवसेंदिवस झपाट्याने वाढतच आहे.

जिल्ह्यात मोठ्या संख्येने रासायनिक प्रकल्प असल्याने अधूनमधून येथे केमिकल लोचा होतच असतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्घटना घडून काहीजण मृत्युमुखी पडतात, तर काहींना कायमचे अपंगत्व येते. हे एकट्या प्रकल्पांमुळेच होते असे नाही, तर येथील वाहतूक व्यवस्था, सुसज्ज रस्ते नसल्यानेदेखील अपघात घडतात.

जिल्ह्यातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी आरोग्य व्यवस्था




उभारण्यात आली आहे. मात्र, ती आता कालबाह्य झाली असून, त्या आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडत आहे. पुरेशा आरोग्य सुविधा नसल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. उपचारासाठी त्यांना नवी मुंबई, मुंबई येथे जावे लागत आहे.

रोहा-कोलाड येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय उभारण्यात येणार असल्याचे दोन वर्षांपूर्वी जाहीर करण्यात आले होते. यासाठी जागादेखील संपादित करण्यात आली आहे. महाड येथे २०० खाटांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, तसेच महाड उपजिल्हा रुग्णालयाची नवीन इमारत उभारुन तेथे १०० खाटांची व्यवस्था करण्याचे नियोजन आहे.

त्याचप्रमाणे उपजिल्हा रुग्णालय उरण येथे १०० खाटांची व्यवस्था असणारी इमारत उभारण्यात येणार आहे. यासाठी सरकारने मंजुरीदेखील दिली आहे. काहींसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे, मात्र अद्यापही कामाला सुरुवात करण्यात न आल्याने हे प्रकल्प रखडले आहेत. यासाठी सुमारे १५० कोटींहून अधिक निधी खर्च होण्याची शक्यता आहे.

काहीच दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या हायपॉवर कमिटीने अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाची सात मजल्यांची इमारत बांधण्याला मंजुरी दिली आहे. १५० कोटी निधीची तरतूददेखील केली आहे. हा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणे गरजेचे आहे.

सरकारने नुसत्या मंजुऱ्या देऊन आणि निधीची तरतूद करुन भागणार नाही, या सर्व प्रल्पांची तातडीने उभारणी करणे गरजेचे आहे. तेव्हाच जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था सुदृढ होईल.



# हुजूर गेले, मजूर आले

इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचा चौदा वर्षांचा वनवास संपला आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या निवडणुकीत मजूर पक्षाने ६५० पैकी ४१२ जागा जिंकून दणदणीत विजय संपादन केला. हुजूर पक्षाला अवघ्या ११९ जागा मिळाल्या. मजूर पक्षाचे केर स्टार्मर हे पंतप्रधान झाले असून त्यामुळे ब्रिटनच्या राजकारणात तसेच इंग्लंड व भारत यांच्या संबंधात नवा अंक सुरू होणार आहे. ब्रिटनमध्ये हुजूर आणि मजूर हे दोनच प्रमुख पक्ष आहेत. यातील हुजूर हा भांडवलवाले, जमीनदार आणि पारंपरिक विचाराच्या लोकांचा पक्ष आहे. तर गरीब, कामगार, स्थलांतरीत इत्यादी लोक हे मजूर पक्षाचे पाठीराखे आहेत. त्यामुळे त्या दोन्ही पक्षांची धोरणेही त्यानुरुप बदलत असतात. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात हुजूर पक्षाचे विन्स्टन चर्चिल हे पंतप्रधान होते. त्यांनी हिटलरविरोधी लढाईत महत्वाची कामगिरी बजावली. मात्र देशातले नागरिक त्यांच्या धोरणांबाबत समाधानी नव्हते. त्यामुळे १९४६ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये ब्रिटिशांनी मजूर पक्षाला निवडून दिले. रशियातील कम्युनिस्ट क्रांतीचा मोठा प्रभाव या पक्षाच्या धोरणांवर होता. भारताला स्वातंत्र्य देण्यातही या पक्षाच्या नेत्यांचे साह्य झाले. त्याच्या प्रभावामुळेच इंग्लंडमध्ये रेल्वे, कोळसा, टेलीफोन, पोस्ट, सार्वजनिक वाहतूक, आरोग्य अशा सेवा सरकारी क्षेत्रातच राहिल्या. त्यांचे खासगीकरण होण्याचे टळले. १९८० च्या दशकात हुजूर पक्षाच्या मार्गारेट थॅचर पंतप्रधान झाल्यावर त्यांनी हे धोरण उलटवले. अनेक कंपन्यांचे खासगीकरण केले. जे जे सरकारी ते ते वाईट अशी उलटी प्रतिमा त्यांनी तयार केली. याचमुळे पाणीपुरवठ्याचेही खासगीकरण झाले. त्या सर्वांचे परिणाम काही काळानंतर दिसू लागले. आता पाणी प्रचंड महाग झाले आहे. सार्वजनिक बसेस कमी झाल्यामुळे लोकांची गैरसोय होत आहे. एकूणच करांचे प्रमाण व महागाई वाढली असून हुजूर पक्षाविरुध्द तीव्र नाराजी व संताप निर्माण झाला आहे. यंदाच्या निवडणुकीत मजूर पक्षाच्या प्रेमापेक्षा हुजूरांवरचा हा संतापच लोकांनी बोलून दाखवला आहे असे म्हटले जाते.

## भारताला कितपत फायदा?

मजूर पक्ष हा त्याच्या नावामुळे व काही धोरणांमुळे आपल्याला जवळचा वाटत असला तरी त्याच्या स्वरुपात काळानुरुप कमालीचा फरक पडलेला आहे हे लक्षात ठेवायला हवे. त्यामुळे नवीन पंतप्रधान स्टार्मर हेदेखील सरसकट काटे उलटे फिरवू शकणार नाहीत. १९९७नंर सत्तेत असलेल्या मजूर पक्षानेच अमेरिकेच्या इराकवरील तद्दन खोट्या कारवाईला पाठिंबा दिला होता. सद्दाम हुसेन यांच्याकडे घातक अण्वस्त्र आहेत असा ठपका ठेवून इराकवर हल्ला करण्यात आला. नंतर सद्दामला पकडून ठार मारण्यात आले. प्रत्यक्षात इराककडे असा कोणताही शस्त्रसाठा नाही हे त्यानंतर स्पष्ट झाले. अमेरिकेला हल्ला करता यावा म्हणून हा सर्व बनाव रचण्यात आला होता व शस्त्रसाठा वगैरे गोष्टी बोगस आहेत हे ठाऊक असूनही ब्रिटनचे मजूर पक्षाचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी अमेरिकेची री ओढली. तिला आंधळा पाठिंबा दिला. नंतर ही बाब उघड होऊनही या नेत्यांनी साधी माफीदेखील मागितली नाही. अमेरिकी हल्ल्यात हजारो इराकी निरपराध नागरिक ठार झाले. याचे प्रायश्चित्त त्यांनी घेतले नाही. शेवटी जनतेनेच त्यांना दूर केले व इतकी वर्षे सत्तेपासून लांब ठेवले. मुद्दा असा की, पक्षाच्या नावात मजूर असले तरी तो हमखास न्यायाची भाषा करील व गरिबांविषयी सहानुभूतीने वागेल याची हमी देता येत नाही. ब्रिटनमध्ये कोरोनानंतरच्या काळात महागाई प्रचंड वाढली आहे. बेकारीचे प्रमाणही मोठे आहे. भारत व इतर देशांमधून नागरिकांचे जे लोंढे येतात त्यामुळे आपल्या नोकऱ्या जातात असे मानणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे त्यांना दुखावून चालत नाही. हुजूर पक्षाच्या माजी गृहमंत्रीबाई तर या स्थलांतरितांना देशातून हाकलून देण्याची भाषा करीत असत. मजूर पक्षाचे लोक तसे बोलणार नाहीत. पण म्हणून भारतीयांना अधिकाधिक व्हिसा मिळू लागेल असेही नव्हे.

## दाताचे दुखणे, देशाचे दुखणे

ब्रिटनमध्ये भारतीय, बांगलादेशी, पाकिस्तानी तसेच मुस्लिम व काळे इत्यादींचे प्रमाण सतत वाढत आहे. यंदा मूळ भारतीय असलेले असे तब्बल २९ नेते खासदार म्हणून निवडून आले आहेत. त्यातील काहींना मंत्रिपदाची संधी मिळणार आहे. अर्थात, मावळते पंतप्रधान ऋषी सुनाक हेही भारतीय वंशाचेच होते व ते दिवाळी वगैरेदेखील जोरात साजरी करीत असत. मजूर पक्षातून निवडून आलेल्यांमध्ये भारतीयांची संख्या लक्षणीय आहे. मात्र म्हणून ते सर्व भारताला अनुकूल भूमिका घेतीलच असे सांगता येत नाही. यातले अनेक जण शीख आहेत. ब्रिटनमध्ये खलिस्तानला छुपा पाठिंबा देणाऱ्यांची संख्या बरीच आहे. त्यामुळे या शीख खासदारांना जपून बोलावे लागते. त्यातील काही अतिरेकी वा आगलावी भूमिकाही घेऊ शकतात. भारत हा जगातील मोठी अर्थव्यवस्था आहे. ब्रिटीश मालाला तेथे चांगली बाजारपेठ मिळू शकते. त्यामुळे भारताशी संबंध सुधारण्यास तो देश उत्सुक असतो. पण तसे करताना त्याला चीन व इतर देशांना नाराज करून चालत नाही. अमेरिकेप्रमाणेच ब्रिटनमध्ये मोटारी, फ्रीज, टीव्ही, मोबाईल यापासून तो रोजच्या वापराच्या असंख्य वस्तू चीनमधून येतात. त्या त्यांना स्वस्त पडतात. गेल्या हुजूर पक्षाच्या राजवटीत ब्रिटन युरोपीय महासंघातून बाहेर पडला. त्यामुळे त्याची अर्थव्यवस्था डळमळीत झाली. तरीही आता तो निर्णय पुन्हा माघारी घेणे शक्य नाही. या स्थितीत मजूर पक्षाला कारभार करणे सोपे राहणार नाही. तेथील राष्ट्रीय आरोग्य सेवा ही सरकारी क्षेत्रातील अतिशय प्रसिध्द आरोग्य यंत्रणा आहे. त्यात ब्रिटनमधील सर्व लोकांना, ते नागरिक नसले तरीही, फुकट इलाज केले जातात. मात्र वाढत्या लोकसंख्येला ही यंत्रणा पुरी पडू शकत नाही. साधा दातदुखीवर इलाज करायला दोन-तीन वर्षांची वेटिंग लिस्ट असते. खासगी दंतवैद्याकडे जाणे म्हणजे दिवाळे काढणे असे तिथले समीकरण आहे. यंदा निवडणुकीत हा विषय चर्चेचा झाला होता. मजूर पक्ष या व इतर विषयांवर कसे मार्ग काढतो हे पाहावे लागणार आहे.

विचार

# नेमका भर कुठे हवा?

*'मध्य प्रदेशचे मख्यमंत्री असताना शिवराजसिंह यांनी शेतीची उत्पादकता वाढवण्याचा तसेच आधुनिक तंत्रज्ञान अंगिकारण्याचा यशस्वी प्रयोग राबवला. देशात खते, अन्नधान्य, ग्रामीण विकास यासाठी वेगवेगळी खाती असून कृषि खात्याला सर्व बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. म्हणूनच त्यांनी कृषि खात्याची पुनर्रचना करून अन्य संबंधित मंत्रालये आणि विभाग त्या अंतर्गत आणण्याचा विचार करायला हवा.*



**हेमंत देसाई**

केंद्रीय कृषीमंत्रीपदी शिवराजसिंह चौहान यांची निवड करण्यात आल्यामुळे मध्य प्रदेशप्रमाणेच देशातही शेतीत आमूलाग्र परिवर्तन होईल, अशी आशा निर्माण झाली आहे. शिवराजसिंह यांनी मध्य प्रदेशचे मख्यमंत्री असताना, तेथील शेतीची उत्पादकता वाढवण्याचा तसेच वेगवेगळी पिके घेण्याचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग राबवला. अमेरिकेत 'यूएस डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर' हे शेती उत्पादन, भूसंवर्धन, अन्न, पोषण संशोधन, मार्केटिंग, ग्रामीण विकास आणि कृषिव्यापार या सर्व गोष्टींची जबाबदारी उचलते. त्याबद्दलच्या निर्णयांचे सर्वाधिकार याच विभागाकडे असतात. भारतात मात्र खते, अन्नधान्य, ग्रामीण विकास यासंदर्भात वेगवेगळी खाती असून कृषी खात्याला सर्व बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. म्हणूनच कृषी खात्याची पुनर्रचना करून अन्य संबंधित मंत्रालये आणि विभाग त्या अंतर्गत आणता येतील का, याचा विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करावा, अशी अपेक्षा आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये देशात शेतकऱ्यांची आंदोलने झाली असून एमएसपी किंवा किमान आधारभावाची त्यांची प्रमुख मागणी आहे. त्याखेरीज, पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमधील शेतकऱ्यांच्या मागण्या आणि भारतातील अन्य राज्यांमधील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या मागण्या यांचाही विचार करावा लागेल. मध्यंतरी गव्हाची निर्यात एकाएकी थांबवण्यात आली. त्यानंतर तांदळाची निर्यात स्थगित झाली. अन्नधान्याच्या साठ्यांवर नियंत्रण आले. तसेच खाद्यतेल आणि कडधान्यांची शुल्कमुक्त आयात करण्याचे धोरण राबवण्यात आले. कांद्याबाबत तर कधी सरळ निर्यातबंदी तर कधी निर्यातमूल्य वाढवून, अप्रत्यक्ष निर्यात नियंत्रण आणण्यात आले. तसेच नाफेड खरेदीतील अनागोंदीमुळे कांदा-उत्पादकांचे करोडोंचे नुकसान झाले. भारताच्या १४० कोटी लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. अशा चुकीच्या धोरणांचा फटका शेतकऱ्यांना बसतो, हे लक्षात घेतले पाहिजे. शेती अर्थव्यवस्थेत सरकारने अनावश्यक हस्तक्षेप करू नये. देशातील अतिरिक्त तांदूळ, गहू आणि इतर शेतमालाची निर्यात करून त्यामधून फायदा मिळवण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे. म्हणूनच एखाद्या धान्याची महागाई झाल्यास, लगेच आयात करून किंवा शेतमालावर अचानक निर्यातबंदीची कुऱ्हाड चालवून, शहरी ग्राहकांना कुरवाळणे थांबले पाहिजे.

२०२१ हे वर्ष देशातील शेती आणि संबंधित बाबींचे निराकरण करण्याच्या पद्धतीमध्ये आमुलाग्र बदलासाठी ओळखले जाईल. गेल्या वर्षी तीन नवीन कृषी कायदे अंमलात आल्यानंतर, शेतकऱ्यांचा विरोध आणि परिणामी परिस्थिती आणि केंद्राने हे कायदे अचानक रद्द करण्याचा घेतलेला निर्णय यांचा कृषी क्षेत्रावर दूरगामी परिणाम होणार आहे. नवीन कृषी कायद्यांची उपयुक्तता आणि गरज यावरील चर्चेदरम्यान भारतीय कृषी क्षेत्राशी संबंधित मूलभूत समस्यांवर ठोस उपाय सापडलेला नाही. देशातील कृषी क्षेत्र सध्या अनेक आव्हानांना तोंड देत आहे. यामध्ये उत्पादनाचा स्थिर दर, उत्पन्नात झालेली घट, हवामानातील बदलांमुळे उद्‌भवणाऱ्या समस्या, माती आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास, सरकारी अनुदान वाटप करण्याच्या पद्धती आदी. कृषी क्षेत्रात सुधारणांची गरज होती आणि आताही तशीच गरज आहे. कोरोना महामारीमुळे गेल्या तीन-चार वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेची स्थिती निश्चितच बिघडली आहे. आता कृषी क्षेत्रावर अधिक परिणाम झाल्याचे दिसते कारण लोकांची क्रयशक्ती कमकुवत झाली आहे. याचा सरळ अर्थ असा की, कृषी माल आणि सेवांची मागणी कमी झाली आहे असून कृषी क्षेत्रासमोर इतर समस्याही निर्माण झाल्या आहेत. इतर व्यवसायांप्रमाणे शेतकऱ्यांनाही हातात पैसा हवा आहे. पीएम-किसानसारख्या योजना सुरू केल्या. त्याचे कारण लहान शेतकऱ्यांकडे पैसे नव्हते आणि व्यवसाय म्हणून शेती करणे आता फायदेशीर राहिलेले नाही.

२०१९ या वर्षीच्या अहवालात नमूद केले आहे की २०१२-१३ आणि २०१८-१९ दरम्यान देशातील सरासरी कृषी कुटुंबाच्या मासिक उत्पन्नातील पीक उत्पादनाचा वाटा ४७.९ टक्क्यांवरून ३७.७ टक्क्यांवर घसरला आहे. शेतीवर आधारित कुटुंबांसाठी रोजंदारी हाच उत्पन्नाचा मुख्य स्रोत राहिला आहे. या सर्वेक्षणात असेही नमूद करण्यात आले आहे की २०१३ ते २०१९ या कालावधीत शेतीवर आधारित कुटुंबांची संख्या ९ कोटींवरून ९.३ कोटी झाली आहे तर याच कालावधीत शेतीमध्ये गुंतलेल्या कुटुंबांची संख्या ६.६ कोटींवरून सुमारे आठ कोटी झाली आहे. म्हणजे शेतीवरच्या अवलंबित्वाची संख्या कमी होण्याऐवजी वाढत चालली आहे, हे चांगले लक्षण नाही. सर्वेक्षणानुसार २०१८-१९ मध्ये भारतातील कृषी व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांवर सरासरी ७४,१२१ रुपये कर्ज होते. २०१२-१३ मध्ये हा आकडा केवळ ४७ हजार रुपये होता. पुढील सहा वर्षांमध्ये उत्पन्नात ६० टक्क्यांनी वाढ झाल्याने, सरासरी कर्जातही तितक्याच प्रमाणात वाढ झाली आहे. २०१२-१३ आणि २०१८-१९ मध्ये उत्पन्नवाढ खऱ्या अर्थाने कमी राहिली. कृषी क्षेत्राला इतर पिकांसह तांदूळ आणि गहू उत्पादनावर भर द्यावा लागेल; तरच परिस्थिती सुधारेल. तेलबिया आणि भरड धान्यांसाठी त्यांच्या विपणनासाठी योग्य किमान आधारभूत किंमत (एमएसपी) सोबत पुरेशी व्यवस्था करावी लागेल. इतर कृषी सुधारणांमध्ये, जमीन भाडेपट्टा कायद्याचा पुनर्विचार करावा लागेल. कृषी कायदा रद्द झाल्यानंतर मिळालेला पहिला धडा म्हणजे या क्षेत्रात कोणतीही सुधारणा करण्यापूर्वी संबंधित जास्तीत जास्त पक्षांचे मत घ्यावे लागेल. जगाचा विचार केला तर बहुतांश पिकांच्या एकरी उत्पादकतेत भारत फारच मागे आहे. एकरी उत्पादकता वाढल्याशिवाय शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत आणि अन्य दराचा फारसा फायदा होणार नाही. आज भारत ही जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून येत्या पाच वर्षांमध्ये तिसऱ्या क्रमांकाची होईल, असे उद्दिष्ट बाळगण्यात आले आहे. २०४७ पर्यंत समृद्ध भारताचे स्वप्न साकारण्यासाठी कोणकोणते टप्पे गाठावे लागतील, याची संपूर्ण आखणी मोदी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. विकसित भारताचे स्वप्न हा सकारात्मक अजेंडा हाती घेण्यात आला आहे. वास्तविक, विरोधकांनादेखील नवीन पिढीला उमेद देणारा, नव्या आशा-आकांक्षांना जन्म देणारा असा कार्यक्रम देणे शक्य आहे. विकसित भारतासाठी शेतीचे आधुनिकीकरण करण्याची गरज आहे. सहकारक्षेत्रात, विशेषतः कुक्कटपालन आणि दुग्धोत्पादन क्षेत्रात ग्रामीण भागातील शेतकरी आणि महिला मोठ्या संख्येने काम करतात. त्यामधून खेड्यापाड्यांचा आणि शेती अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलू शकेल.

१९९१-९२ ते २०२३-२४ या काळात भारताचा सरासरी आर्थिक विकासदर ६.१ टक्के होता तर शेतीक्षेत्राचा ३.३ टक्के होता. गेल्या दहा वर्षांचाच विचार केला तर एकूण विकासदर ५.९ टक्के असून कृषीविकासाचा दर ३.६ टक्के इतका आहे. विकसित भारत हा सर्वसमावेशक असावा, असे वाटत असेल तर शेतीक्षेत्राची क्षमता पूर्णपणे वापरात येणे आवश्यक आहे. त्यासाठी उत्पादकता वाढायला हवी आणि पाण्याचा वापर घटायला हवा. भूजलाचे पुनर्भरण झाले पाहिजे, जमिनीची धूप थांबवली पाहिजे आणि शेतीमधून होणारे हरितवायूचे उत्सर्जन कमी केले पाहिजे. एकीकडे शेतीक्षेत्रातील काम करणाऱ्यांची संख्या कमी झाली पाहिजे आणि अशा लोकांना नवी कौशल्ये शिकवून, उत्पादक रोजगार मिळवून देणे जरूरीचे आहे. म्हणूनच ग्रामीण भागात कौशल्यविकासाचा कार्यक्रम प्राधान्याने राबवायला हवा. तसेच शेतीसंशोधन, कृषी विस्तारसेवा, शेतीतील नवे प्रयोग, पाणलोट क्षेत्रविकास यावर मोठ्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक आहे. मुळात कुक्कुट, मत्स्य, दुग्धजन्य उत्पादने, फळे, भाज्या अशा जास्त लाभ मिळवून देणाऱ्या शेतीकडे अधिक प्रमाणात वळले पाहिजे. तसेच शेतीक्षेत्रात लागवडीपासून बाजारापर्यंत एक मूल्यसाखळी तयार करण्याची आवश्यकता आहे. डिजिटल कॉमर्स, कंत्राटी शेती हे प्रयोग अधिक प्रमाणात राबवायला हवेत.

आजकाल

# दहा वर्षांनी मुंबईत दुष्काळ पडण्याचा धोका



**ॲड. गिरीश राऊत**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयात पुरेसा पाणी संचय अजून झाला नाही. 'अप्पर वैतरणा' जलाशय अजून कोरडा आहे. याला कारण पावसाचा अभाव आहे, असे शासन व महापालिकेला वाटते.

परंतु दरवर्षी मान्सून अधिक बेभरवशाचा का होत आहे, याचा विचार नाही. फक्त मुंबईला पाणी पुरवणे एवढेच मान्सूनचे कार्य अभिप्रेत आहे असे दिसते.

याच वेळी पंतप्रधान मुंबईत येऊन गोरेगाव-मुलुंड लिंक रोड योजनेतील भूयारांच्या निर्माण कार्याची आणि ऑरेंज गेट आणि ग्रँट रोड मधील जोड रस्त्याच्या बांधकाम निर्माणाची सुरूवात करणार आहेत.

या बांधकामांचा संबंध पावसाचे वेळापत्रक मोडण्याशी आहे. पाऊस न येण्याचे किंवा कोणत्याही ऋतूत असाधारण वृष्टी होण्याचे कारण हवामान बदल आहे. या हवामान बदलाचे कारण औद्योगिक विकासामुळे पृथ्वीच्या तापमानात झालेली वाढ आहे. ही वाढ कार्बन डाय ऑक्साईड व इतर वायू आणि द्रव्यांच्या प्रमाणातील वाढीमुळे आहे. तापमानवाढीस कार्बन डाय ऑक्साईड वायू ९०% जबाबदार आहे.

या वायूच्या ९५% उत्सर्जनास मोटार व इतर स्वयंचलित वाहने, कोळसा जाळून तयार होणारी वीज आणि सीमेंट कॉंक्रिट जबाबदार आहे. याच प्रक्रियेत कार्बन डाय ऑक्साईड शोषणाऱ्या व जीवन विकसित करणाऱ्या हरितद्रव्याचा, जंगलांचा, डोंगरांचा आणि पाण्याचा नाश होत आहे. पंतप्रधान, देशातील मुख्यमंत्री व इतर मंत्री देशभर जी उदघाटने व भूमीपूजने? करत आहेत, तीच मान्सून मोडण्यास, उष्माघातात हजारोंचे बळी घेणाऱ्या उष्णतेच्या लाटा आणण्यास, नेहमी येणाऱ्या वादळांना, अवर्षणाला, दुष्काळांना, वणव्यांना, हिमनद्या कोसळण्याला, महापूरांना व समुद्राच्या आक्रमणाने किनारपट्ट्या बुडण्याला कारण आहेत.

कार्बनने वातावरणात ४०० पीपीएम ही धोकादायक पातळी ओलांडल्यानंतर, वाढत्या कार्बनवर नजर ठेवणाऱ्या महत्वाच्या, हवाई विद्यापीठाने दहा वर्षांपूर्वीच जगातील तापमानवाढीमुळे शहरांच्या ओस पडण्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्याप्रमाणे सन २०३४ मधे मुंबई ओस पडेल. मात्र ज्याप्रमाणे अदाधुंद प्रकल्प आणले जात आहेत व आताची औद्योगिकरणामुळे पृथ्वीच्या सरासरी तापमानात दर वर्षी होत असलेली ०.२ से ची महाविस्फोटक वाढ पाहता त्याहीपेक्षा आधी मुंबई ओस पडेल.

कालच नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या रायगडमधील हजारो मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मागण्या ३३ वर्षे झाली तरी पूर्ण केल्या नाहीत म्हणून धरणावर जाऊन नवी मुंबईचा पाणीपुरवठा बंद करण्याचा प्रयत्न केला.

औद्योगिक शहरे ही नुसती बांडगुळे नसून कॅन्सर आहेत. तो देखील तिसऱ्या अवस्थेत गेला आहे तरीही जनतेला त्याची जाणीव नाही. व्यसनासक्त माणुस व्यसन सोडण्याऐवजी मादक द्रव्याला पर्याय शोधतो तसे आधुनिक मानवजातीचे झाले आहे. आपला अंत जवळ आला आहे तरी भौतिक विकास आणि जीवनशैलीचे व्यसन सोडण्याऐवजी ती ऊर्जांचे व तंत्रज्ञानाचे पर्याय शोधण्यात मौलिक वेळ दवडत आहे. आपल्या अज्ञानाला कृति न करण्यासाठी सबब बनवत आहे.

लोकसंसद

## सत्कार सोहळ्यानंतरचे कवित्व

यंदा वेस्ट इंडिज आणि अमेरिकेमध्ये आयोजित केलेल्या ट्वेन्टी २० क्रिकेटचे विश्वचषक अंतिम विजेतेपद पटकवणाऱ्या जगज्जेत्या भारतीय संघाचे समस्त मुंबईकरांनी न भूतो न भविष्यती अशी गर्दी करून स्वागत केले ते अपेक्षितच होते. कारण मुंबई हीच भारतीय क्रिकेटची पंढरी मानली जाते. या मोठ्या प्रमाणात उसळलेल्या लाखोंच्या गर्दीचे मुंबई पोलिसांनी अचूक आणि योग्य नियोजन केल्यामुळे कुठेही गालबोट लागले नाही आणि भारतीय संघाचा संपूर्ण स्वागत आणि सत्कार सोहळा अगदी सुरळीतपणे पार पडला. मात्र या कौतुक सोहळ्यामुळे नागरिकांना गैरसोयींना तोंड द्यावे लागले. या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही काळ रुग्णवाहिका अडकून पडल्या. स्टेडियममधील मोठ्या गर्दीला आवरताना कर्मचाऱ्यांची मोठी दमछाक झाली. त्यातच गर्दीमुळे काहींना भोवळ आली. वानखेडे स्टेडियम आणि आजूबाजूच्या परिसरात चपलांचा आणि प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा ढीग पसरला. तो निस्तरताना सफाई कर्मचाऱ्यांच्या नाकी नऊ आले. दुसरीकडे या स्पर्धेनंतर लागलीच झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाचा झिम्बाब्वे क्रिकेट संघाने पहिल्या सामन्यात पराभव केला. अर्थात झिम्बाब्वे क्रिकेट संघाला ट्वेन्टी २० क्रिकेटच्या विश्वचषकात अंतिम २० संघात स्थान मिळू शकले नव्हते आणि भारतीय संघात आयपीएलच्या 'स्टार' खेळाडूंचा भरणा होता ही गोष्ट अलाहिदा! **- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**८ जुलै**

**१८६९:-** इतिहास संशोधक बाबासाहेब देशपांडे यांचा जन्म. मराठयांच्या इतिहासासह शिवराय आणि रामदास हे त्यांच्या अभ्यासाचे विषय. 'श्री सज्जनगड' हे त्यांनी लिहिलेले मराठी पुस्तक. **१९१६:-**कादंबरीकार, दुर्ग साहित्यिक गो. नी. दांडेकर यांचा जन्म. गोनीदा यांच्या नावावर २२ कादंबऱ्या, ६ प्रवासवर्णने, ११ धार्मिक व पौरोणिक ग्रंथ, नाटके आणि बालसाहित्य आहे. 'आम्ही भगीरथाचे पुत्र', 'आनंदभुवन' या सामाजिक विषयांवर कांदबऱ्या लिहिल्या. **१९२८:-** ख्यातनाम साहित्यिक श्रीपाद रामचंद्र काळे यांचा जन्म. 'अजून चालतेची वाट','एक धागा सुखाचा','पहारा', 'भूक','सोबत' मिळून ४० हून अधिक कादंबऱ्या. तसेच एक काळ एक वेड','किर्लोस्कर कथा','पायगुण','प्रथा', 'मोरपीस' ह्या कथा मिळून पन्नासहून अधिक कथा-कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. **१९३९:-** लेखक नारायण जानोजी बावणे यांचा जन्म. ह्यांच्या साहित्यसंपदेत काही संपादित ग्रंथासह 'संत जगन्नाथ भाग ११' हा गीतासंग्रह, 'संत जगन्नाथ माहात्म्य' हे चरित्र आणि 'संत जगन्नाथ पारायण','बेलपत्र','हरिपाठ' हे अध्यात्मिक ग्रंथ त्यांच्या नावावर आढळतात. **१९३९:-** लेखक वसंत महादेव पाटणकर यांचा जन्म. 'स्मृती मंजुषा' हे पुस्तक त्यांनी माई साठे यांच्या सहकार्याने लिहिल्या. **१९४९:-** योगी डॉ. संप्रसाद विनोद यांचा जन्म. योग या विषयात तज्ञ असणाऱ्या डॉक्टरांनी 'शवासनातून आत्मविकास' या पुस्तकातून 'शवासन-ध्यान' ह्या वैशिष्ट्यपूर्ण ध्यान पध्दतीचं सविस्तर विवेचन. 'मनाचे आरोग्य आणि मन:शांती' यातून मनाचे आरोग्य आणि मनाची शांती कशी प्राप्त करावी याविषयी मार्गदर्शन. 'ध्यान एक दर्शन व मार्गदर्शन' हा ध्यानाविषयीच्या सर्व मूलभूत शंकांचं अत्यंत सोप्या भाषेत निरसन करणारा एक अद्वितीय ग्रंथ. 'परदेशप्रवासातील योगचिंतन' मधून पाचात्यांची विचारसरणी, त्यांची जीवन पध्दती, त्यांचे योगविषयाचे गैरसमज यासंबंधीचे अनुभव. 'संकल्पपूर्तीचा राजमार्ग' या पुस्तकातून इच्छाशक्ति साधून इच्छापूर्ती म्हणजे संसार आणि इच्छामुक्ती म्हणजे दु:खमुक्ती कशी साधावी याविषयीचे सुलभ मार्गदर्शन. **१९५६:-** कवी शिवशंकर नागो धुगूल यांचा जन्म. 'शिंपल्यातील मोती' हा त्यांचा काव्य संग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५७:-** कवियत्री विजया दिपक अेबंडवार यांचा जन्म. 'जाणीव','ही वाट चालताना' हे काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९६१:-** धार्मिक आणि सामाजिक विषयांवरील नाटककार नारायण रामसिंग बामणगावकर यांचे निधन. 'सचित्र धनुर्भंग' नाटिका अर्थात सीतास्वयंवर' हे सीतास्वयंवर व 'आत्मतेज' नाटक हे द्रौपदीवस्त्र हरणावर आणि नामदार ए.एस.एस हे सामाजिक विषयावरील नाटक त्यांच्या नावावर जमा आहे. **१९६२:-**लेखक डॉ. संजय गोविंदराव पोहरकर यांचा जन्म. यांच्या 'सावरकर काव्यमीमांसा', 'आता पेटवू सारे रान' हे वैचारिक, 'देव अंघोळीला गेले', 'कलियुगातील ध्रुवतारा' हे काव्यसंग्रह तर 'संवाद कौशल्य' हे शैक्षणिक आणि 'मुलांसाठी सावरकर' हे चरित्रवजा पुस्तके त्यांनी लिहिले. **१९६५:-**लेखिका कमलाबाई देशपांडे यांचा जन्म. बालविधवा असणाऱ्या कमलाबाईंनी मोठ्या हिमतीने शिक्षण घेतले. भारत सेविका समाज ही विधवांसाठी असणारी संस्था चालवताना आलेल्या अनुभवातून त्यांनी 'चिमण्या' हा ग्रंथ साकारला. तसेच 'हसरा निर्माल्य' हे व्यक्तिचित्रांची पुस्तके तयार केली. यातून वृद्ध स्त्रिया, भाजीवाली, वसतिगृहातल्या लहान मुली यांची व्यक्तिचित्रे त्यांनी साकारली. **१९७८:-** लेखक दत्तात्रय ना. भापकर यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'शिवारातल्या गोष्टी' हा कथासंग्रह. 'बेणं' ही कादंबरी, 'माया कविता' हा कवितासंग्रह, 'पुरंदरचं रत्न' ही ऐतिहासिक कादंबरी, 'दिग्लोरिअस स्टोरीज' इंग्रजी, 'पुण्यनगरी वर्तमानपत्रासाठी' अभ्यासपूर्ण लेख (दहावी विद्यार्थ्यांसाठी) अशी साहित्य संपदा. **१९८४:-**'आनंदयात्री' कवी, कथा, कादंबरीकार, ललित लेखक बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचे निधन. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षीच 'प्रतिभा' हा काव्यसंग्रह प्रकाशित. 'तेथे कर माझे जुळती' या कवितेच्या गायनाने महाराष्ट्रभर नावलौकिक झाला. 'जीवन संगीत','दूधसाखर' मिळून १४ काव्यसंग्रह प्रकाशित. 'कागदी होड्या', 'पावसापुरता प्रकाश' हे ललित लेखसंग्रह तर 'मावळता चंद्र', 'भावीण','प्रियदर्शिनी' ही त्यांच्या ललित साहित्यावरील पुस्तके. रवींद्रनाथांवर काही पुस्तके लिहिली, तसेच म.गांधीजींच्या पुस्तकांच्या आणि स्टीफन स्वाइंगच्या कादंबऱ्यांचे अनुवाद केले. भारतीय जीवनात अनुस्यूत असलेली विचारधारा आणि सांस्कृतिक परंपरा यातून बोरकरांच्या सर्वच लेखनाचे जीवनरस घेतलेला आहे. **१९९४:-** मराठ्यांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. विठ्ठल त्र्यंबक गुणे यांचे निधन. **२००३:-** समीक्षक आणि संत साहित्याचे अभ्यासक डॉ. ह. श्री. शेणोलीकर यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ जुलै

१) श्री.ज्योतिप्रकाश गणपतराव मुकादम ०८-०७-१९४४, अलिबाग

२) श्रीम.शरयू दामोदर मगर ०८-०७-१९५०, वेश्वी, अलिबाग

३) श्री.प्रकाश भगवान डबरी ०८-०७-१९५४ कोळीवाडा, अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**१. दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

# पोलादपूरमध्ये खैरतस्करी रोखली

## ट्रकसह खैराचे ४३० सोलीव तुकडे जप्त

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील खैरतस्करांवर वनविभागाने पूर्णपणे नियंत्रण मिळविले असताना पोलादपूर येथील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वनउपज तपासणी नाक्यावर चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक ४३० खैराचे सोलीव तुकडे घेऊन जाताना जप्त करण्यात आला आहे.

बुधवार, दि. ३ जुलै रोजी रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, सहायक वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव, महाड परिक्षेत्र वनअधिकारी राकेश साहू यांच्या मार्गदर्शनाखाली वनउपज तपासणी नाका-पोलादपूर येथे मुंबई-गोवा महामार्गावरून चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक (क्र.जीजे १७ यूयू ९८३७) ची तपासणी पोलादपूरच्या स्थानिक वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली असता ट्रकमध्ये खैराचे अंदाजे ६८ हजार ५७२ रूपये किमतीचे ४३० बिनपासी सोलीव तुकडे असा मुद्देमाल मिळाल्याने ट्रकचालक सिद्दिक अब्दुलरहीम वाढेल, रा. गोधरा, ता. जिल्हा-गोधरा (राज्य गुजरात) व अन्य एक इसमाविरूद्ध कारवाई करून ट्रकदेखील जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या ट्रकची किंमत अंदाजे ७ लाख रूपये आहे.



(छायाचित्र : शैलेश पालकर)

या कारवाईमध्ये पोलादपूर वनपाल बाजीराव पवार, तपासणी नाका वनरक्षक नवनाथ मेटकरी, वनरक्षक पोलादपूर संदीप परदेशी, तपासणी नाका पोलादपूरचे वनरक्षक सचिन मेने, निलेश नाईकवाडे, प्रियांका जाधव, अमोल रोकडे हे सामील होते.

# वडखळ रस्त्याचा वाली कोण?

## अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ

**। पेण । प्रतिनिधी ।**

कांदळेपासून वडखळ नाक्यापर्यंतच्या रस्त्याला गेली तीन ते चार वर्षे वालीच उरला नाही. त्यामुळे रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय असून, हा रस्ता बंद होण्याच्या मार्गावर आहे.

जरी मुंबई-गोवा महामार्ग वडखळ बायपास करून जात असला तरी वडखळमध्ये येण्यासाठी कांदळे गावापासून वडखळपर्यंत कांदळे, इंद्रनगर आणि वडखळ, नवेगाव, या गावांमध्ये जाण्यासाठी जुन्या रस्त्याचाच उपयोग करावा लागतो. परंतु, त्या रस्त्याची मालकी नक्की कुणाची याबाबत अधिकारी उडवाउडवीची उत्तर देत आहेत. वडखळ सरपंच आणि सदस्यांनी याबाबीचा पाठपुरावा केल्यानंतर त्यांच्या हाती भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकीकरणाचे एक पत्र पडले असून, त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, वडखळ जुना रोड हा राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. परंतु, अधिकारी वर्ग मानायला तयार नाहीत. त्यावेळी वडखळ सरपंचासह सदस्यांनी आमच्या प्रतिनिधीशी संपर्क करून वडखळ जुन्या रस्त्याची करूण काहानी सांगितली. लगेच आमच्या प्रतिनिधीनी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण निरंजन चौवरे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क करून विचारणा केली असता पहिल्यांदा त्यांनी उडवाउडवीची उत्तर दिली. परंतु, ज्यावेळी कृषीवल प्रतिनिधींनी ३० एप्रिल २०२४ च्या पत्रासंदर्भात विचारणा केली, त्यावेळी असे कोणतेच पत्र आमच्याकडे आलेच नाही. आमच्या कार्यालयाचा या रस्त्याशी संबंध नाही, अशा प्रकारे उत्तर दिली. परंतु, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकीकरणाचे पत्र पूर्ण वाचून दाखविल्यानंतर निरंजन चौवरे यांनी सांगितले की, मी कागदपत्र घेऊन फिरत नाही, पत्र आले असेल; परंतु मला माहीत नाही. या सर्व बाबींवरून अधिकारी वर्गाचा हलगर्जीपणा समोर येतोय. जर ३० एप्रिल रोजी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण यांना रितसर पत्र पाठवून वडखळ जुना रस्ता वर्ग केला असेल, तर आपली जबाबदारी का स्वीकारत नाहीत. त्यानंतर निरंजन चौवरे यांनी अभियंता सिंगासने यांच्याशी संपर्क करण्यास सांगितले. परंतु, अभियंता रुपेश सिंगासने यांना वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला; परंतु संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी त्या अधिकाऱ्यांविरूध्द कारवाईची मागणी केली असून, लवकरच वडखळचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेणार आहेत.



# शेतकऱ्यांना गांडूळ खताचे वाटप

## कर्जत प्रेस असोसिएशनचा उपक्रम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र कृषी दिनाचे निमित्ताने कर्जत प्रेस असोसिएशनकडून तालुक्यातील विविध ठिकाणी कृषीविषयक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यावेळी कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायतीमधील जांभुळवाडी येथील ५० शेतकऱ्यांना भाजीपाला बियाणे, तुरीच्या झाडांची रोपे तसेच परसबागेत लावण्यासाठी जंगली झाडांची रोपे आणि गांडूळ खताचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन जांभुळ वाडी जिल्हा परिषदेच्या शाळेत करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने आदिवासी महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाला स्थानिक ज्येष्ठ ग्रामस्थ आणि तरुणवर्ग सहभागी झाले होते, तसेच कर्जत प्रेस असोसिएशनचे मुख्य विश्वस्त संतोष पेरणे, सामाजिक उपक्रम प्रमुख दीपक बोराडे, संस्थेचे अध्यक्ष भूषण प्रधान उपस्थित होते.



दरम्यान, वाडीतील ५० हून अधिक शेतकऱ्यांना दोन तुरीची रोपे, जंगली झाडे, तसेच महिलांना एक किलो गांडूळ खत आणि चार प्रकारच्या भाजीपाला बियाणे यांची पाकिटे भेट देण्यात आली. उपस्थित शालेय विद्यार्थ्यांनाही खाऊचे वाटप केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर चव्हाण, शिक्षक संजय घरत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत पारधी, कर्जत प्रेस असोसिशनचे सल्लागार किशोर गायकवाड, संघटनेचे कार्याध्यक्ष अभिषेक कांबळे, उपाध्यक्ष संदेश साळुंखे, खजिनदार रोशन दगडे, कृष्णा सगणे, अरुण बैकर, सतीश पाटील, रामदास माळी, महेश भगत यांच्यासह स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वीजप्रवाह सुरळीत

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

आंबिवली गावातील बस स्टॉप येथे असलेल्या ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यामुळे गेले अनेक दिवस वीजपुरवठा खंडित होत होता, त्याचबरोबर यांचा मानसिक त्रास येतील ग्रामस्थांना सहन करावा लागत होता. सदर ग्रामस्थांच्या समस्या विचारात घेता माजगाव सरपंच दीपाली पाटील त्यांच्यासमवेत विद्यमान सदस्यांनी पुढाकार घेत शुक्रवारी या ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा सुरळीत केला. जुन्या ट्रान्सफॉर्मरमुळे विजेचा प्रवाह कमी अथवा जास्त होल्टेजमध्ये येत होता. त्याचबरोबर सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते.

## ई-रिक्षामुळे माथेरानची विकासाकडे वाटचाल



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान अंतर्गत वाहतुकीची गहन समस्या ई-रिक्षाच्या माध्यमातून पूर्णत्वास जात असून, स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने ई-रिक्षा ही स्थानिकांसह पर्यटकांसाठी पर्वणीच ठरत आहे. माथेरानला ई-रिक्षा सुरू झाल्याची चर्चा सर्वदूर पसरल्याने आता पावसाळ्यातसुद्धा पर्यटकांची तोबा गर्दी पहावयास मिळत असून, सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. कधी नव्हे एवढी प्रचंड गर्दी यंदाच्या पावसाळ्यात तसेच शनिवारी आणि रविवारी त्याचप्रमाणे मधल्या काळातसुद्धा ई-रिक्षासाठी पर्यटकांच्या रांगा लागलेल्या दिसत आहेत, तर तिन्ही शाळांच्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना त्याचप्रमाणे शासकीय अधिकारी वर्गाला ने-आण करण्यासाठी अत्यंत माफक दरात ही सेवा उपलब्ध होत असल्याने मागील काळात ज्यांनी ज्यांनी ह्या सेवेला ताकदीनिशी विरोध दर्शविला होता, त्यांनीसुध्दा या ई-रिक्षाचाच स्वीकार करून आपल्या मुलांना शाळेत जाण्यासाठी ई-रिक्षाचे पास काढून दिले आहेत. त्यामुळे सर्वांनी ई-रिक्षाचा स्वीकार केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. अनेकदा रुग्णांसाठी नगरपरिषदेची रुग्णवाहिका नादुरुस्त असल्यामुळे रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी ह्याच सेवेचा अधिक लाभ सर्वांनाच होत आहे. वृद्ध, अपंग, ज्येष्ठ नागरिक, पर्यटक, शालेय विद्यार्थी ई-रिक्षाच्या सेवेचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेत आहेत.



## दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

आर्द्रा नक्षत्राच्या पडलेल्या दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला असून, मुरुड तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील खलाटीतील लावणीच्या हंगामास सुरुवात झाली आहे.

मुरुड तालुक्यात आतापर्यंत ६७७ मि.मी. पाऊस झाला असला तरी तो शेतीसाठी पुरेसा नाही. जोरदार तुरळक सरींनी येथील खलाटीत थोडेफार पाणी साचले आहे. बियाण्यांच्या पेरणीपासून येऊन-जाऊन पाऊस पडत असल्याने राबांची स्थिती उत्तम असली तरी अनेक ठिकाणी बियाणे तुरळक प्रमाणात उगवले असल्याने यावर्षी रोपांचा तुटवडा जाणवणार आहे.

पाणथळ शेतीतील राबांची चांगली वाढ झाली असून, लावणी करण्यासाठी येथे पाणीही उपलब्ध असल्याने अशा खलाटीतील लावणीची कामे जोरात सुरू झाली आहे. मात्र, शेतीला अधिक पावसाची गरज आहे. त्याखेरीज उखारु शेतीची लावणीची कामे सुरू होणार नाहीत, अशी माहिती खारीक वाड्यातील शेतकरी दामोदर पांडुरंग राऊत यांनी दिली.

## रस्त्याने घेतला मोकळा श्वास

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्रापासून जवळच असणाऱ्या सारसई खारपाडा रस्त्यावरील कालिवली खिंड व रस्त्यातील वळणावर जुनाट वृक्षांच्या फांद्या झुकल्याने मोठ्या आपघाताची भीती होती. या रस्त्यावर अनेकदा झुकलेल्या व जुनाट फांद्या पडून अपघात झाले आहेत. झाडांच्या या फांद्या काढण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगाडे यांनी संबंधितांना सांगितली. परंतु, कित्येक महिने होवूनही कोणीही लक्ष दिले नाही. शेवटी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने फांद्या तोडून रस्ता मोकळा केला.

## कमी खर्चात जास्त उत्पादन
# देणाऱ्या भातलागवडीचा शोध

**। रसायनी । वार्ताहर ।**

सध्या सर्वत्र शेतीची कामे सुरू आहे; परंतु, मजूर मिळत नाहीत म्हणून शेतकरी दादा वैतागलेला असतो. कसळखंड गावचे प्रगतशील शेतकरी कमलाकर धोंडू घरत यांनी सन २०२१ला कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी भातलागवड शोधून काढली. त्या लागवडीला एक एकर शेती जमिनीला सात किलो बियाणे तसेच लागवडीला एक एकरला फक्त नऊ मजूर लागतात.

भाताची ४ ते ५ रोपे घेऊन एक फूट बाय एक फूट सरळ रेषेत केली तर रोपांना २५ ते २७ फुटवे येतात. कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी



### कमलाकर घरत यांचा यशस्वी प्रयोग

ही भातलागवड केली आहे. दरम्यान, ग्रुप ग्रामपंचायत कसळखंडचे सरपंच संजय घरत तसेच ग्रामसेवक श्री. लवटे आणि ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचाऱ्यांनी कमलाकर घरत प्रगतशील शेतकरी यांच्या शेतावर जाऊन पाहणी केली. ग्रामसेवक लवटे यांनी म्हटले की, ही भातलागवड सर्व शेतकऱ्यांनी अंमलात आणली तर शेतकऱ्यांची उन्नती होईल आणि देशाची आर्थिक प्रगती होईल.

# आदिवासी विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**

शिवसेना उध्दव ठाकरे रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर व पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील आदिवासी वाड्यांमधील शाळांमध्ये शालेय वह्या वाटप करण्यात आले आहे.



राजकीय व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारे आपटे पंचायत समितीचे संपर्क प्रमुख तुकाराम गायकवाड यांच्या पुढाकाराने शालेय साहित्य वाटपाचा हा सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, आपल्या परिसरातील आदिवासी, गरीब नागरिकांची मुले उच्च शिक्षण घेऊन पदवीधर व्हावीत हा त्यांचा मानस आहे. यासाठी तुकाराम गायकवाड हे नेहमीच सातत्याने प्रयत्न करत असतात. तसेच त्यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला त्यांचे सहकारी जांभीवलीचे माजी उपसरपंच अशोक कोंडिलकर व सवणे येथील शिवसैनिक अनिल देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी तुकाराम गायकवाड, अशोक कोंडीलकर, अनिल देशमुख आदींनी सवणेवाडी, तुळशीमाळ वाडी, गायचरणवाडी, खुटलवाडी, कालिवलीवाडी, बागेचीवाडी, जांभीवलीवाडी आदी ठिकाणी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप केले.

## पाककला स्पर्धेत ज्योती भोसले प्रथम

**। तळा । वार्ताहर ।**

खासदार सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तळा शहरातील मंगलकार्यालयात शनिवार, दि.६ जुलै रोजी महिलांसाठी शोध सुगरणीचा तालुकास्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महिलांनी कोकणात पिकणाऱ्या वस्तूंपासून विविध प्रकारचे पदार्थ बनविले होते. स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे रेफ्रिजरेटर पारितोषिक ज्योती भोसले यांनी पटकावले. द्वितीय मायक्रोव्हेव ओव्हन हे पारितोषिक प्रिती ठिगळे यांनी तर तृतीय पारितोषिक असलेले मिक्सर रुबिना परदेशी यांनी पटकावले.

# भातलावणीसाठी आदिवासी सरसावले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात दिलासादायक पाऊस झाल्याने बळीराजा सुखावला आहे. सध्या भात रोपे तरारली असून, शेतकरी भातलावणीच्या कामात गुंतले आहेत. दरम्यान, डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजाला लावणीच्या कामातून आता रोजगारनिर्मिती होत आहे. पुढील महिनाभर म्हणजेच जुलैअखेरपर्यंत भातलागवडीची धामधूम सुरू राहणार असून, त्यासाठी आदिवासी बांधवांचे हात सरसावले आहेत. या शेतीच्या कामातून आदिवासी बांधवांना रोजगार प्राप्त होणार असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटणार आहे.



भातलागवडीला सुरुवात झाली आहे. लावणीसाठी आदिवासी समाजातील पुरुष, स्त्रियांना मागणी आहे. वेगवेगळ्या भागातून ही मंडळी लावणीच्या कामासाठी येतात. त्यांच्या कामाचा योग्य मोबदलाही दिला जातो.
– सतीश म्हात्रे, शेतकरी

आदिवासी समाजातील काही मंडळी पाऊस संपल्यावर वीटभट्टीवर कामाला जातात. त्यातून त्यांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. त्यानंतर पावसाळ्यात शेतीची कामे करतात, तर काहीजण डोंगरावर उताराच्या ठिकाणी भाजीपाल्याची लागवड करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात.

> उन्हाळ्यामध्ये वीटभट्टीसह अन्य ठिकाणी कामाला जातो. त्यातून मिळणाऱ्या मजुरीतून घरखर्च भागवला जातो. पावसाळ्यात सर्व कामं बंद असल्यानं मजुरीचा प्रश्न निर्माण होतो. परंतु, आम्ही ग्रुप करून शेती लावणीच्या कामाला जातो. त्यामुळे हक्काचा रोजगार उपलब्ध झाला आहे.
> – रमेश पवार, आदिवासी बांधव

रायगड जिल्ह्यामध्ये ९८ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भातलागवड केली जाणार आहे. गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यामध्ये पावसाने सुरुवात केली आहे. शेतकरी आता लावणीच्या कामांमध्ये मग्न असल्याचे दिसून येत आहे. लावणीची कामे करण्यासाठी मजूरकर म्हणून आदिवासी पुरुष व महिलांना शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे.

## नवीन खाते उघडण्यासाठी लगबग
# ‘लाडकी बहीण’साठी महिलांची बँकेत गर्दी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**‘लाडकी बहीण’ या योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात एक हजार ५०० रुपये जमा होणार आहे. या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत लागला आहे. जिल्ह्यातील अनेक महिलांची बँकेत नवीन खाते उघडण्यासाठी तसेच बंद असलेले खाते नव्याने चालू ठेवण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांची दमछाक होऊ लागली आहे.**



राज्य सरकारने एक जुलैपासून ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना सुरु केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी बहिणींची गर्दी उसळली आहे.रायगड जिल्ह्यातील विविध भागात ‘लाडकी बहीण’ योजनेसाठी ऑफलाईन व ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. ग्रामपंचायत कार्यालयांसह जिल्ह्यातील सेवा केंद्रामध्ये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महिलांची गर्दी होत असताना, या योजनेसाठी लागणारे बँक पास बुक झेरॉक्स, खाते क्रमांक आदींची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे काही महिलांनी बँक खाते उघडले नसल्याने त्यांची चांगलीच धावपळ सुरु झाली आहे. जिल्ह्यातील सरकारी बँकांमध्ये नवीन खाते उघडण्यासाठी महिलांची बँकेसमोर रांग दिसून येत आहे. जिल्ह्यातील अनेक बँकांमध्ये महिलांची गर्दी वाढल्याने बँक कर्मचाऱ्यांची दमछाक होऊ लागली आहे. दैनंदिन कामांबरोबरच या योजनेसाठी नवीन खाते उघडण्यासाठी व बंद असलेले खाते चालू ठेवताना कर्मचाऱ्यांची तारेवरची कसरत होत आहे. जिल्ह्यातील बँकांमध्ये आतापर्यंत दोनशेहून अधिक खाते उघडण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

### अंगणवाडी सेविकादेखील लागल्या कामाला

**लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दर महिन्याला एक हजार ५०० रुपये देण्याची घोषणा सरकारने केली आहे. या योजनेचा लाभ बहिणींना मिळावा यासाठी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविकादेखील कामाला लागल्या आहेत. गावागावात महिलांच्या बैठका घेऊन योजनेची माहिती देणे, त्यांच्याकडून ऑफलाईन अर्ज भरणे, लागणारी कागदपत्रे जमा करण्याचे काम सुरु केले जात आहे. त्यामुळे शैक्षणिक कामाव्यतिरिक्त या योजनेच्या कामांचा भार अंगणवाडी सेविकांवर पडला आहे.**

# प्रकल्पग्रस्तांच्या शाळांना भूखंड मिळावे

## महेंद्र घरत यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**


प्रकल्पग्रस्तांच्या शाळांना भूखंड मिळावे, या मागणीचे निवेदन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी मुख्यमंत्र्यांना दिले आहे. सिडको प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक संस्था चालवीत असलेल्या शाळांना भूखंड मिळण्यासाठी दोन वर्षांपूर्वी सिडको प्रशासनाकडून प्रकल्पग्रस्तांसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. प्रकल्पग्रस्तांच्या बऱ्याच संस्थांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही ही निविदा सिडकोकडून नंतर रद्द करण्यात आली होती. त्यानंतर त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही.



कामगार नेते तथा रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत हे सिडकोकडे पाठपुरावा करत आहेत; परंतु सिडको व्यवस्थापन पाहिजे तितके लक्ष देताना दिसत नाही. त्यामुळे महेंद्र घरत यांनी नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानभवनात भेट घेऊन निवेदन दिले व या प्रश्नाकडे लक्ष घालण्याची विनंती केली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# वर्षासहलीसाठी खुणावताहेत रायगडातील धबधबे

## जगबुडी नदीपात्रात कोसळणारा कुडपणचा धबधबा



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील मिनी महाबळेश्वर म्हणून सर्वपरिचित मात्र, इंग्रजांनी अविकसित ठेवलेले हिलस्टेशन आजतागायत अविकसितच राहिले आहे. भरदिवसा आकाशातील ढगांमध्ये वावरत असल्याचा आभास निर्माण व्हावा, असे येथील सृष्टीसौंदर्य असून, या कुडपणमध्ये भीमाची काठी हा सुळका आश्चर्यचकित करणारा हवेतील बेटासारखा भूभाग आहे.

कुडपण खुर्दमध्ये भराडी नदी, भुतरान नदी आणि आवेरी नदी अशा तीन नद्यांचा संगम भराडी नदीसमोरील औदुंबराच्या वृक्षापासून जवळच्या पात्रात होऊन पुढे हे पात्र धबधब्यापासून हजारो फूट दरीमध्ये खोल कोसळून तयार होणारे पात्र रत्नागिरी जिल्ह्यातील खेड व चिपळूण तालुक्यांतून वाहणारी जगबुडी नदी म्हणून ओळखले जात आहे. अलीकडेच कुडपण खुर्द आणि कुडपण बुद्रुकदरम्यान एका कड्याजवळ एक पेव्हर ब्लॉकचा रॅम्प तयार करण्यात आला असून, याठिकाणाहून या धबधब्यासह भीमाच्या काठीचे विलोभनीय दर्शन घडत आहे.

**कसे जाल?-** पोलादपूर येथे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून अर्धा कि.मी. अंतरावरील चोळई नदीवरील दि लेप्रसी मिशन ऑफ इंडियाच्या लेप्रसी हॉस्पिटललगतच्या कोतवाल रस्त्याकडे जाणाऱ्या फाट्यावरून देवपूरच्या पुढे गोळेगणी परसुले येथून क्षेत्रपाळपर्यंत जाऊन तेथून आमलेवाडी, कुडपण बुद्रुक, कुडपण खुर्द व शेलारांचे कुडपण याठिकाणी वर्षापर्यटनासाठी अवश्य जावे.

सोबत चहा, पाणी, खाद्यपदार्थ, आधाराची काठी, टॉवेल, फोटोग्राफीची आवड असल्यास कॅमेरा अथवा मोबाईल फोन सोबत न्यावे.

## अमृतेश्वर मंदिराचा गायमुखी धबधबा



**। म्हसळा । वार्ताहर ।**

निसर्गाचे वरदान लाभलेल्या म्हसळा तालुक्यातील देवघर येथील स्वयंभू अमृतेश्वर मंदिराजवळचा गायमुखी धबधबा पावसाळ्यात ओसंडून वाहू लागल्याने येथे वीकेंडला पर्यटकांची मांदियाळी वाढली आहे.म्हसळा शहरापासून अवघ्या ४ कि.मी. अंतरावर दिघी-पुणे राष्ट्रीय महामार्गालगतच असलेल्या इतिहासकालीन स्वयंभू अमृतेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरून वाहत असलेल्या छोटेखानी नदीच्या पात्राला २० फूट उंचीवरून दगडाने कोरलेल्या गायीच्या शिल्पाच्या मुखातून कोसळणाऱ्या धबधब्याची रुंदी ३० फूट आहे. येथे येण्या-जाण्यासाठी सुखकर मार्ग आहे. डोंगरदरीतून वाहत येणाऱ्या स्वच्छ निर्मळ पाण्यात अपघात होण्याची कोणतीही भीती नसल्याने अनेक पर्यटकांना हा धबधबा आकर्षणीय ठरत आहे. कुटुंब व मित्रमंडळींसोबत अनेक पर्यटक देवघराच्या धबधब्यात पोहण्याचा मनमुराद आनंद लुटतात, शिवाय पर्यटन आणि देवदर्शन असा योगायोग घडून येतो. येथील धबधबा स्वच्छ व एकांतात असल्याने वाहून येणारे पाणी दगडामध्ये कोरलेल्या गायीच्या मुखातून येत असल्याचे विहंगम दृश्य पाहून पर्यटकांना अन्य ठिकाणापेक्षा हा धबधबा जास्तच आकर्षणीय होत आहे.

## फणसाड धरणाला तरुणाईची पसंती



**। अलिबाग । वार्ताहर ।**

पावसाळा सुरू झाला की तरुणाईला वेध लागतात ते वर्षासहलीचे. डोंगर कपाऱ्यातून वाहणारे धबधबे, धरणातील धावणारे पाणी अंगावर घेण्यासाठी आतुरलेली युवा मंडळी वर्षासहलीचे प्लॅनिंग करतात. मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यातील फणसाड धरणाला तरुणाईच्या उत्साहाचा बहर वर्षासहलीच्या निमित्ताने पहावयास मिळतो.

मुरूड तालुक्यातील बोर्ली येथून अंदाजे सहा ते सात कि.मी. अंतरावरील वळणा-वळणाच्या रस्त्याने जाऊन भोईघर गावावरून पुढे काजुवाडी, बेलवाडी गावाच्या पुढे डोंगरात फणसाड अरण्यातील फणसाड धरणावर जाता येते. पावसाळी पाण्याने तुंडूब भरलेले धरण तसेच आजूबाजूच्या डोंगर कपारीतील मनमोहक दृश्य, धरणावरून काजुवाडी तसेच बेलवाडी गावासह धरणामुळे परिसरातील हिरवीगार शेतीतील नांगरणीचे दृश्य डोळ्यांना विलोभनीय निसर्गसौंदर्याची भुरळ पाडते.

फणसाड धरणातून बोर्ली पंचक्रोशीतील बावीस गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. शासनाच्या पाटबंधारे विभाग कोलाडच्या अखत्यारीत हे धरण असल्याचे सांगितले जाते. परंतु, नजीकच्या भोईघर ग्रामपंचामतीच्या हद्दीत असलेल्या फणसाड धरणाचे सोयरसुतक नसल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे ग्रामपंचायतीमार्फत येथे वर्षासहलीप्रेमी मंडळींसाठी सुविधा पुरविल्या जात नाही, असे म्हटले जाते.

फणसाड डॅमला वर्षा सहलीच्या निमित्ताने तरूणाईची मोठी पसंती आहे. पावसाळ्यात दर शनिवार तसेच रविवारी मोठी गर्दी पहावयास मिळते. डोंगर कपारीत वसलेल्या निसर्गसौंदर्याची मुक्त हस्ते उधळण असलेला परिसर युवावर्गाला भावतो, मनमोकळेपणाने एक वेगळा आनंद मिळविता येतो. धरणातून वाहून जाणाऱ्या पाण्यात ओलेचिंब भिजत बसण्याची मज्जा काही औरच असते. नेहमीच दगदगीच्या जीवनातून वनडे पिकनिक म्हणून फणसाड डॅमचे महत्त्व पावसाळ्यात दिवसेंदिवस वाढत आहे. पुढे सुविधांची उपलब्धता होईलच; परंतु तरूणाईच्या उत्साहाला सुरक्षिततेचे कवच फारच जरूरीचे आहे. नाहीतर फणसाड डॅमच्या वर्षासहलीना गालबोट लागू शकेल. मात्र, फणसाड डॅमचे वर्षासहलीचे महत्त्व वाढले तर निश्चितच स्थानिकांना रोजगाराचे साधन निर्माण होईल, हेही खरेच.

## ‘मोरझोत’ वर्षापर्यटनाचा मानबिंदू



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील उमरठ मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या रस्त्यावरून नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे सुशोभिकरण व तेथून पुढे रामाचे कुडपण येथील नरवीरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सुशोभिकरण पाहून झाल्यानंतर थेट चांदके ते खोपड रस्त्यालगत पावसाळ्यात एक मोठा जलौघ थेट रस्त्याच्या मोरीपर्यंत जलतुषारांची सप्तरंगी उधळण करीत सुखावतो. या धबधब्याला मोरझोत धबधबा म्हणून तालुक्यासह महाड, पोलादपूर, माणगाव परिसरामध्ये ओळखले जाते. महाड तालुक्यातील वरंध घाटामधून रामदासपठारच्या सुंदरमठासमोर दिसणारा मोरझोत धबधबा पोलादपूर तालुक्यातील उमरठपासून दीड कि.मी.अंतरावर चांदके ते खोपड दरम्यान आहे.

मोरझोत धबधबा हा खोपड ते चांदके रस्त्यालगतच असल्याने सुगम आहे. परंतु, तेथे जाण्यासाठी अलीकडेच पंतप्रधान ग्रामसडक योजनेचा रस्ता जीर्ण होऊ लागल्याने तसेच उमरठपर्यंतचा रस्ता पक्का नसल्याने वर्षासहलींमधून येणाऱ्या तसेच मोटारसायकलस्वार पर्यटकांना कंबरडे ढिले करणारा अनुभव घ्यावा लागतो. रस्त्याच्या दुतर्फा साईडपट्ट्यांवर लालमातीचा चिखल वाहनांच्या टायरसोबत रस्त्यावर येऊन रस्ते निसरडे होत आहेत. मात्र, थ्रील अनुभवण्यासाठी विविध ‘व्हॉट्सॲप’ ग्रुपचे मुंबई, महाड, पुणे, खेड आणि अन्य भागांतील तरूण-तरूणी येथे आठवड्याच्या शेवटी आवर्जून येत असतात. प्रवासातील दु:खद अनुभव घेत वाटचाल करणारी तरूणाई भरपावसात थेट चांदके रस्त्यावर जलतुषारांची उधळण करणाऱ्या मोरझोत धबधब्याचे दर्शन घेताच हर्षोल्हासाने चित्कार करीत नेसत्या वस्त्रानिशी धबधब्याखाली उभी राहण्यास आसुसलेली असल्याचे दिसून येते. तरूणाईकडे फोरव्हीलर असेल तर आतील म्युझिक सिस्टीमच्या दणकेबाज आवाजात ‘रेन डान्स’देखील केला जातो.

या धबधब्यावर वर्षासहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे येथे मक्याची कणसं, कोंबडी मटण-वड्यांची सागुती, चणे, शेंगदाणे, पॉपकॉर्न आणि स्नॅक्स तसेच गरमागरम चहाच्या गिऱ्हाईकांकडून स्थानिकांना दिवसागणिक चांगली कमाई होत असते. ‘विकेंड’ सुट्टीच्या दिवसांत जरी तरूणाईला काही प्रमाणात अपेयपानाची झिंग असली तरी आठवड्याच्या अन्य दिवशी येणारे वर्षापर्यटक मात्र निखळ आनंद घेण्यास मित्र-मैत्रिणींचा ग्रुप अथवा सहकुटुंब मित्रपरिवार येऊन मोरझोत धबधब्याखाली उभे राहून सचैल स्नान करतात.

२०२१ मध्ये या मोरझोत धबधब्याजवळ दरडी कोसळल्यामुळे गेल्या दोन वर्षांमध्ये पर्यटकांनी सावधपणे धबधब्याचा आनंद घेतला. मात्र, आता परिसरातील दरडी पूर्णपणे हटविण्यात आल्याने धबधब्याचे पात्र पूर्वीप्रमाणे शुभ्रधारेने कोसळून सप्तरंगी जलतुषारांची बरसात करीत आहे.

## सावधान! ट्रेकिंगसाठी येताय तर काळजी घ्या



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मान्सूनचे आगमन होताच माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी ट्रेकिंगसाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. अनोळखी ठिकाणी ट्रेकिंगसाठी येणारे ट्रेकर्स काहीवेळा रस्ता भरकटत असतात. अशा ट्रेकर्स यांच्यासाठी माथेरान पोलीस ठाणे आणि सह्याद्री रेस्क्यू टीमकडून आवाहन करण्यात येत आहे.

पावसाळा सुरू झाल्यानंतर निसर्गाने नटलेल्या गड, किल्ले, धरण, धबधबे, डोंगर, माळरानावर पावसाचा आनंद घेण्याकरिता आणि ट्रेकींगसाठी प्लॅन तयार करीत असतात.ट्रेकिंग आणि पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटक ट्रेकर्स यांच्याकडून प्रशासनाने दिलेल्या सूचनांचा विचार न करता आततायीपणा दाखवला जातो. त्यामुळे दुर्घटना टाळण्यासाठी माथेरान पोलिसांनी एक विशेष मोहीम सुरु केली असून, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी आवाहन केले आहे.काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवली आणि त्या ठिकाणी मोबाईल नेटवर्क नसेल तर पोलिसांना संपर्क साधता येईल. या सर्व गोष्टींचा विचार करून मगच माथेरानला ट्रेकींगसाठी यावे, असे आवाहनही माथेरान पोलिसांनी केले आहे. त्यामुळे माथेरानला येण्याअगोदर येथील पर्वतीय रस्ते व त्याच्या सुरक्षिततेची योग्य माहिती असणे गरजेचे असल्याचे आवाहन माथेरान पोलिसांनी केले आहे. ट्रेकींगला येताना भौगोलिक माहिती घेऊन सुरक्षित ट्रेकींगचे रस्ते निवडावे, असेही सांगण्यात आले आहे.

माथेरानच्या डोंगरातील विकटगड आणि गार्बेट प्लाटू या ठिकाणी ट्रेकिंगसाठी पर्यटक ट्रेकर्स येत असतात. त्याचवेळी माथेरान मध्ये येताना रामबाग पॉइंट तसेच धोधानी या भागातून येणाऱ्या ट्रेकर्स यांनी माथेरान मधील भौगोलिक रचना आणि पायवाटा रस्ते यांची आधी माहिती घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

माथेरानमध्ये आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास दामोदर खतेले (माथेरान पोलीस ठाणे) ०८३७९९०९:०६१ किंवा सुनील कोळी (माथेरानमधील सह्याद्री रेस्क्यू टीम) ०७०९८३३३७५० यांच्याशी संपर्क साधावा.

## शेतकरी शेतात, बाजारपेठेत शुकशुकाट



**। तळा । वार्ताहर ।**

तालुक्यातील शेतकरी वर्ग लावणीच्या कामात गुंतल्याने तळा बाजारपेठेत शुकशुकाट पसरल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तळा तालुका हा दुर्गम व डोंगराळ भागात वसलेला असल्याने शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने येथील नागरिक शेती करूनच त्यातुन आपला उदरनिर्वाह भागवितात. शेतीतून मिळालेल्या उत्पन्नावरच येथील नागरिक आपल्याला लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू बाजारपेठेतून खरेदी करतात. परंतु गेल्या दोन ते तीन दिवसांपासून तळा बाजारपेठेत ग्राहकांअभावी शुकशुकाट पसरले आहे.

तालुक्यातील बहुतांश शेतकरी वर्ग शेती लावणीच्या कामात व्यस्त असल्यामुळे बाजारपेठेत नागरिकांची वर्दळ कमी झाली असून जवळपास आणखी आठ ते दहा दिवस लावणी चालणार असल्याने बाजारपेठेत मंदीचे सावट पाहायला मिळत आहे. व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपल्या दुकानात माल भरला आहे. परंतु ग्राहकांअभावी मालाची विक्री होत नसल्याने व्यापारी वर्गात देखील चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## कर्जत तालुक्यात भातलावणीला वेग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात भाताच्या लावणीला सुरुवात झाली असून मजुरांचा अभाव असताना देखील शेतीची मशागत करण्यास शेतकरी गुंतले आहेत.त्यात पावसाची सुरू असलेली उघडीप यामुळे देखील शेतीची कामे वेगाने सुरू आहेत.

कर्जत तालुका हा कृषी प्रधान तालुका असून या तालुक्यात भाताची शेती खरीप हंगामात केली जाते.या तालुक्यातील दहा हजार हेक्टर जमिनीवर भाताची शेती केली जाते.त्यासाठी शेतकऱ्यांनी जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाचा अंदाज बघून भाताची रोपे यांची लागवड केली होती.त्यानुसार जुलै महिना सुरू झाल्यानंतर भाताच्या रोपांची वाढ लक्षात घेवून शेतकऱ्यांनी भाताची लावणी करण्यास सुरुवात केली आहे.त्यात डोंगर रांगेत असलेल्या गावातील शेतकऱ्यांनी भाताची लावणी पूर्ण देखील केली आहे.गतवर्षी जून महिन्यात सुरुवात दणक्यात केल्यानंतर पुढे पावसाने थेट विश्रांती घेतली होती.त्यानंतर भाताची रोपे पुन्हा जगविण्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन करावे लागले होते. गतवर्षी जास्त पावसाने भाताची रोपे फुकट केली होती आणि त्यावेळी दुबार भाताची रोपे शेतकऱ्यांना आपल्या शेतात टाकावी लागली होती. यावर्षी चांगला पाऊस झाल्याने भाताची रोपे आजपर्यंत सुस्थितीत असून भाताच्या रोपांची वाढ देखील समाधानकारक पाऊस यामुळे झाली आहे.

> आमच्याकडे सातत्याने मजूर घरच्यासारखे काम करीत असतात. त्यामुळे आम्हाला मजुरांची कोणतीही अडचण भासत नाही. शेतीच्या कामासाठी चांगला पाऊस पडत आहे, पण लावणी केलेल्या भाताच्या पिकावर रोगराई पसरू नये यासाठी पावसाची दमदार हजेरी आवश्यक आहे. एक चांगला पूर गरजेचा असून, त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहेत.
> – मोहन शिंगटे, शेतकरी पाथरज





> आमच्या शेतकऱ्यांच्या मजुराचा प्रश्न मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे वाढला आहे. सर्व भगिनी या योजनेत नावनोंदणी करण्यासाठी दररोज घराबाहेर पडत असल्याने महिला या शेताच्या कामासाठी मिळत नाहीत.
> – सुनील घोडविंदे, शेतकरी तळवडे

त्यामुळे तालुक्यात बहुसंख्य ठिकाणी भाताची लावणी शेतकऱ्यांनी सुरू केली आहे.त्यात मोठे जमीन क्षेत्र असलेले शेतकरी यांनी यांत्रिकीकरण यांची जोड शेतीच्या कामाला दिली असल्याचे दिसून येत आहे.कर्जत तालुक्यात सध्या भात लावणीचा हंगाम सुरू असून, शेतकरी भाताच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

## अतिउत्साहीपणा टाळा!



**। नेरळ । वार्ताहर ।**

जिल्ह्यातील कर्जत खालापूर तालुका पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा मानला जातो. पर्यटन वाढीस लागले पाहिजे यात कुठेही दुमत नाही, पण प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी व सामाजिक बांधिलकी आहे. कोणत्याही पर्यटनस्थळावर बंदी घालण्यापेक्षा तेथील भागातील रहिवासी, ग्रामस्थाना, गावप्रमुख व सरपंच यांना विश्वासात घेऊन तेथे काय उपाययोजना व खबरदारी घेता येईल यावर विचार विनिमय केला पाहिजे म्हणजे तेथील स्थानिक रोजगार विकसित होईल त्याला चालना मिळेल व पर्यटकांची ही सुरक्षा राखली जाईल.

> कर्जत तालुक्यामध्ये व इतर भागांमध्ये साहस आउटडोर व वेप फाउंडेशन या सामाजिक संस्था आपत्कालीन काळात किल्लयांवर, दऱ्या खोर्यामध्ये, डोंगरांमध्ये, नदी, नाल्यांमध्ये अडकलेल्या लोकांचे, पर्यटकांचे प्राण वाचवण्याचे काम करत आहे.
> – संतोष दगडे, एव्हरेस्टवीर, कर्जत

**पावसाळा पर्यटनात अशी घ्या काळजी**

* किल्ल्यांवरील बुरुजांवर किंवा दरीच्या टोकावर उभे राहून फोटो अथवा सेल्फी काढणे टाळले पाहिजे.
* एखाद्या भागात आपण नदी नाले अथवा धबधबे, धरणामध्ये आपण फिरायला किंवा पर्यटनासाठी जाणार असाल तर आजूबाजूच्या परिसराची माहिती असणे गरजेचे आहे.
* नदी, धरण व धबधबे येथे पाण्याचा अंदाज पटकन येत नाही, तेव्हा शक्यतो पाण्यात जाणे टाळले पाहिजे.
* स्थानिक व गावकरी यांना सोबत ठेवणे, त्यांच्याशी योग्य संवाद साधला गेला पाहिजे.
* अनुभवी व प्रशिक्षित ट्रेकिंग ग्रुपसोबतच जायला हवे.
* आपण जात असलेल्या ठिकाणाची माहिती आपण जाण्यापूर्वी आपल्या कुटुंबाला देणे गरजेचे आहे.
* मद्यपान, ध्वनीप्रदूषण, प्लास्टिक कचरा यांसारख्या निसर्गला हानिकारक गोष्टी टाळल्या गेल्या पाहिजेत.
* स्थानिक व इतर पर्यटकांना घृणास्पद वाटेल अशी कृते करणे टाळावे.
* जेथे जेथे धोकादायक व अपघात घडण्याची जास्त शक्यता आहे, तेथे माहिती फलक व आपत्कालीन संघटनांचे नंबर असणे जास्त गरजेचे आहे.

# आंबेवाडी बाजारपेठ बनली चिखलपेठ

## जीव मुठीत घेऊन करावा लागतोय प्रवास; प्रवासी, नागरिक त्रस्त



**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील आंबेवाडी बाजारपेठेतील रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे आणि चिखलामुळे वाहन चालकांसह प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशी वर्गातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील चौपदरी करणाऱ्या रस्त्याच्या कामाला गेली १२ वर्षापूर्वी सुरुवात करण्यात आली असुन अद्याप हे काम रखडलेल्या अवस्थेत आहे. या महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम पावसाळा सुरु होण्याच्या एक महिना अगोदर सुरु केले. परंतु हे काम सुरु करण्याच्या अगोदर दोन्ही बाजूला असणाऱ्या बायपास रस्त्याचे काम सिमेंट कॉंक्रीटने करणे गरजेचे होते. परंतु, असे काही झाले नाही. हे काम न करता उड्डाण पुलाचे काम सुरु केले. या मार्गांवरून जाणारी वाहतूक दोन्ही बाजूच्या बायपास रस्त्यावरून वळविण्यात आली. गेल्या आठवड्यापासून पडत असलेल्या पाऊसामुळे या रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे.

या महामार्गांवरील रात्री वाहतूक कमी झाल्यानंतर सिमेंट मिश्रित खडीने खड्डे भरण्याचे काम केले जात आहेत. परंतु जोरदार पावसामुळे खडी एकीकडे सिमेंट एकीकडे. यामुळे या रस्त्याला चिखल व खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. हा चिखल येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांमुळे नागरिकांच्या अंगावर उडत आहे, तर व्यावसायिकांच्या दुकानात उडून विविध वस्तू खराब होत आहेत. याला जबाबदार कोण असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाच्या नवीन कामासाठी केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्याकडून एकूण ६००० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, तर दुरुस्तीच्या कामासाठी तब्बल १९२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हा खर्च चिखलात गेला असल्याची परिस्थिती पहावयास मिळत आहे.

आंबेवाडी नाक्यावरील बाजारपेठेचे मध्यवर्ती ठिकाण असुन येथे मुंबई, ठाणे, पुणे, रत्नागिरी तसेच मुरुड, अलिबाग अशा चारही बाजूकडील प्रवाशी ये-जा करीत असतात. त्यामुळे येथे प्रवाशी वर्गाची मोठया प्रमाणात वर्दळ सुरु असते. परंतु या रस्त्याला पडलेले खड्डे व चिखल पाहून आजवरचे लोकप्रतिनिधी या समस्या सोडविण्यासाठी अपयशी ठरले आहेत. हे एकंदरीत परिस्थिती वरून दिसून येत असुन आता तरी ''उघडा डोळे बघा निट, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

# उरण येथे संततधार कार्यक्रम



**। उरण । वार्ताहर ।**

सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी ब्राम्हण सभा उरणतर्फे संततधार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री गणेशाच्या मुर्तीवर अखंड २४ तास संततधार करण्यात आली. शनिवारी सकाळी ६ वाजल्यापासून रविवारी सकाळी ६ वाजेपर्यंत अखंड २४ तास अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी वैभव राईलकर, चंद्रकांत साठे, सुशांत जोशी, दिलीप जोशी, राहुल देशक, संदीप वैशंपायन, गजानन धामणकर यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळ, ब्राम्हण सभा विस्तारित मंडळ, ब्राम्हण महिला मंडळ, कार्यकारी मंडळ सहभागी झाले होते.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - **मुख्य संपादक**

# नवघर शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा पारिषद आदर्श शाळा नवघर येथील विद्यार्थ्यांना दत्तात्रेय वांजले यांच्यावतीने शनिवार (ता.६) रोजी वह्या व पेन असे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सुतार यांच्या प्रयत्नाने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात रा. जि. प. शाळा नवघर येथील मंथन स्पर्धेला बसणाऱ्या १८ विद्यार्थ्यांची परीक्षा फी अनिल बंसारी यांच्याकडून मिळवून देऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणास बहुमूल्य मदत केली.

कार्यक्रमासाठी सरपंच माई चव्हाण, उपसरपंच संजय मोरे, माजी सभापती रमेश सुतार, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राकेश जाधव, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सुतार, निलेश जाधव, अर्पिता सुतार, संचिता तोंडे, सविता शिर्के, अश्विनी वाघमारे, संगीता बैकर, वृषाली गुरव, शीतल पाटील, अनुजा माने व अंकिता जाधव, शिक्षकेतर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. अनिल राणे यांनी आभार मानले.

# धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वृक्ष लागवड संवर्धन मोहीम



**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान झाडे लावत नाही, तर त्यांचे संगोपन करतात. पदमश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनखाली मुरुड परिसरातील ८३ श्रीसदस्य सकाळी ७ वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत मुरुड ग्रामीण हॉस्पिटल, तहसीलदार कार्यालय, समुद्रकिनारी, राजपुरी व डोंगरी परिसरातील लावलेल्या झाडांना स्वच्छ करून त्यांना कुपन केले. परिसरातील गवत काढून कचरा गोळा केला आणि रिकाम्या जागेत नवीन झाडे लावली. असा उपक्रम दर वर्षी राबविल्याने लावलेली झाडे आता मोठी झाली आहेत. परिसर सुंदर दिसू लागला आहे.

डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी नेहमी श्रीसदस्यांना शिकवण देतात की, झाडांना आपल्या घरातील सदस्य समजा. त्यांच्या संगोपनासाठी लागणारे पाणी, खत द्या. त्याला कुपन करून जागवा. घरातील माणसांना जसे जपतो तसे झाडांना जपा हीच झाडे तुमच्या कुटुंबाला सांभाळणार आहेत. पुढे येणाऱ्या वातावरणातील बदलला सामोरे जाण्यासाठी झाडाची संख्या वाढली पाहिजे. श्रीसदस्य पावसाळ्यात झाडे लागवड करतात. त्यांची निगा राखतात. दर शुक्रवारी पाण्याच्या टाक्या टेम्पोत घेऊन प्रत्यक्ष झाडाला पाणी देण्याचे काम करतात.

दरम्यान, मुरुड तालुक्यातील सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रतिष्ठानतर्फे झाड लावण्यात आली आहेत. तसेच ती जगववण्यात आल्याने पर्यटकांना झाडे आनंद देत आहेत.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



# ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता अभियान

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

शासनाच्या आरोग्य विभागाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व रुग्णालये व आरोग्य संस्थामध्ये स्वच्छता सप्ताह तसेच प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून त्याचाच भाग मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक डॉ.उषा चोले यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.उषा चोले, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचारी वृंद स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-22/ 24-25 RFX 7000032011 | Work of construction of 02 Nos of 100kV Bays for 100kV RCF - I & II feeders at 100kV Thal s/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 85.93 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 05.07.2024 to 12.07.2024 up to 11:00 hrs, Opening date:-12.07.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9920117819 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# संततधार पावसाने पनवेल पाण्यात

## आदई, कळंबोलीत नागरिक त्रस्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

गेले दोन दिवस संततधार पाऊस पडत असल्याने पनवेल तालुक्यात ठिकठिकाणी सखल भागात पाणी साचले आहे. तालुक्यातील आदई आणि कळंबोली परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांच्या घरात पाणी शिरले, तर अनेक वाहने पाण्याखील गेली होती. कळंबोलीत २३ ठिकाणी पाणी खेचण्यासाठी मोटर पंप तैनात केले आहेत.

पनवेल आणि परिसरात शनिवारपासून पावसाने आपली संततधार सुरु ठेवली आहे. शनिवार आणि रविवार विकेंड असल्याने अनेकांनी पावसाचा आनंद घेतला. पनवेल शहरातील तालुका पोलीस ठाणे परिसर, मिडल क्लास सोसायटी, टपाल नाका, ठाणा नाका अशा सखल भागात पाणी साचतेच, पण कधीही पाणी न साचणाऱ्या लाईन आळी सारख्या ठिकाणी देखील पाणी साचून राहिले होते. कळंबोली वसाहत, कामोठे वसाहत या ठिकाणी तसेच आदई गावात मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले पाहायला मिळाले.आदई येथे इमारती बांधण्यात येत आहेत. या इमारती बांधताना पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य नियोजन केले गेले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. इमारतीच्या आवारात दोन फूट पाणी साचल्याने वाहन चालकांना त्याचा फटका बसला. सुट्टी असून नागरिकांना काळजीपोटी बाहेर पडता आले नाही. दरम्यान, काहींनी मात्र विकेंड चांगलाच एन्जॉय केल्याचे पाहायला मिळाले. कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे कळंबोली वसाहत पूर्णतः जलमय झाली. वसाहतीमधील साचलेले पाणी खेचण्यासाठी बसवण्यात आलेले सिंग हॉस्पिटल जवळील पंप हे रात्रभर बंद राहिल्याने पाणी कळंबोली वसाहतीत पूर्णता साचले. तीन ते साडेतीन फूट उंचीपर्यंत पाणी साचल्याने अनेकांच्या घरातही पाणी शिरले. एलआयजी भागातील साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या मोटरसायकल व चार चाकी वाहनही पाण्यात बुडाल्याने त्यांचेही लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेकांनी आपल्या रिक्षा व दुचाकी सुरक्षित स्थळी नेल्या. नागरिकांना झालेल्या या त्रासाचे मात्र देणे घेणे ना सिडकोला ना महापालिकेला.

# नवी मुंबई पोलीस दल झाले सुसज्ज

**पनवेल :** १ जुलैपासून तीन नवीन कायद्यांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी अत्याधुनिक आणि ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीचा वापर करणे क्रमप्राप्त आहे. परंतु नवी मुंबई पोलिसांनी या अगोदरच चार पावले पुढे टाकली आहेत. त्यांच्याकडे दोन इन्वेस्टीगेशन कार सज्ज झालेल्या आहेत. त्यामध्ये फॉरेन्सिक एक्सपर्ट आणि इतर तांत्रिक बाबी उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे राज्य पोलिसांमध्ये नवी मुंबई पोलीस दल खऱ्या अर्थाने ॲडव्हान्स असल्याचे दिसून येत आहे.

नवीन कायद्यानुसार कलम, शिक्षा, दंड याबाबत बदल करण्यात आले आहेत. याची अंमलबजावणी सुरु आहे.

# शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

## लायन्स क्लब सोल यांचा उपक्रम



**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात जामरुंग परिसरात मुंबई येथील लायन्स क्लब सोल यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी हिरेवाडी, सराईवाडी, ठोंबरवाडी आणि जामरुंग या पाच शाळांमध्ये जावून हे साहित्य वाटप करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील जामरुंग परिसरातील सामाजिक कार्यकर्ते मंगेश कदम आणि संतोष पिंपरकर यांच्या माध्यमातून दरवर्षी त्या भागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले जाते. मुंबईतील सामाजिक संस्था या कामात पुढाकार घेत असतात. यावर्षी मुंबई येथील लायन्स क्लब सोल यांच्या माध्यमातून शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तेथील जामरुंग येथील प्रभाकर नारायण पाटील माध्यमिक विद्यालय,रायगड जिल्हा परिषद शाळा जामरुंग, सराईवाडी, ठोंबरवाडी, हिरेवाडी या शाळांमधील विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर वह्या, पेन, पेन्सिल,कंपास बॉक्स,रबर,शॉपनर आदी साहित्याचे वाटप केले गेले.

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-21/24-25 RFX 7000031880 | Replacement of control and relay panels at 220kV Uran and 220kV JNPT substation under EHV (O&M) Dn. Panvel. | Rs. 128.93 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 5000/- + GST Submission of bids from 05.07.2024 to 12.07.2024 up to 11:00 hrs, Opening date:- 12.07.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9920117819 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-26 24-25 RFX 7000032017 | SITC of 100kV Bay at 100/22kV Shahapur substation under Dombivali Dn | Rs. 76.91 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 05.07.2024 to 12.07.2024 up to 11:00 hrs, Opening date:-12.07.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9920117819 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# शाळेलगतच्या बारवर बुलडोझर कधी?

**। पनवेल । वार्ताहर ।**

पुण्यामधील कल्याणी नगर येथे घडलेल्या घटनेमुळे अनेक ठिकाणचे लेडीज बार आणि पबवर स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय यंत्रणांनी बुलडोजर फिरवला आहे. यासंदर्भात राज्य शासन अतिशय कठोर भूमिका घेत असताना पनवेल तालुक्यातील कोन येथे शाळेच्या भिंतीला लागून लेडीज बार असताना त्याच्यावर कारवाई होताना दिसत नाही.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मंत्र्यांनी आदेश देऊनही याबाबत कार्यवाही झाली नाही. नियमापेक्षा अंतर जास्त असल्याचा दावा याच विभागाच्या अधिकाऱ्यांनी केल्याने ज्ञानाच्या मंदिराच्या बाजूला छम छम सुरू आहे.

पनवेल परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात लेडीज बार आहेत. या ठिकाणी मोठ्या संख्येने आंबट शौकीन पैसे उडवण्यासाठी येतात. दरम्यान, कोन येथे अगदी शाळा आणि मंदिराच्या बाजूला लेडीज बार आहेत. ज्ञान आणि श्रद्धेच्या मंदिरालगत अशाप्रकारे लाईव्ह ऑर्केस्ट्रा बार चालवला जात आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ही बार संस्कृती येथे फोफावली आहे. प्रसार माध्यमांनी या संदर्भात आवाज उठवल्यानंतर पोलिसांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बारमालकांवर कायदेशीर कारवाई केली. परंतु यासंदर्भात ठोस भूमिका राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी घेतलेली नाही. शाळा सुरू असतानाच त्या ठिकाणी बारबाला येतात. त्याचबरोबर छम छम सुरू होते. या बार संस्कृतीचा परिणाम बालमनावर होत आहे. याबाबत प्रसारमाध्यमांनी सुद्धा आवाज उठवला होता. महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री शंभूराज देसाई यांनी शाळांच्या बाजूला असलेल्या बारवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. परंतु ते आदेश फक्त नावापुरतेच राहिले आहेत. पनवेलसह इतर शहरांमधील शाळा परिसरात बार व मद्य विक्री सुरू आहे.

**पनवेलची लेडीज बार संस्कृती कुप्रसिद्ध!**

मुंबईचे प्रवेशद्वार असणारे पनवेल हे चार जोड निर्मिती आणि औषधाच्या कारखान्यासाठी प्रसिद्ध होते. ऐतिहासिक पनवेल म्हणूनही ओळख आहे. बाजारपेठ आणि बंदराचे शहर म्हणजे पनवेल होते. परंतु त्यानंतर लेडीज आणि डान्सबारचा विळखा या भागाला पडला. त्यामुळे लेडीज बार संस्कृती म्हणून हा परिसर कुप्रसिद्ध झाला. दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी डान्सबार बंद केले. परंतु ऑर्केस्ट्राच्या नावावर पनवेल आणि आजूबाजूच्या भागामध्ये बार संस्कृती सुरू आहे.

* उत्पादन शुल्कमंत्र्यांचे आदेश नावालाच
* कोन येथील छम छमला सरकारी आश्रय
* अंतर जास्त असल्याचा शासकीय दावा

पक्ष फोडाफोडीच्या राजकारणानंतर ट्रिपल इंजिन सरकार महाराष्ट्रामध्ये आले. त्यानंतर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली. त्याचबरोबर लेडीज बार संस्कृतीला याच काळामध्ये चालना मिळाली. शाळेच्या बाजूला अशाप्रकारे छम छम सुरू असेल तर भावी पिढीवर त्याचे काय परिणाम होतील, याचा विचार सरकार आणि संबंधित विभागाने करणे आवश्यक आहे. विधानसभेची निवडणूक येऊ घातली आहे. जागृत आणि सुसंस्कृत मतदार याबाबत नक्कीच शासनाच्या या भूमिका आणि धोरणा विरोधामध्ये संघटितपणे मतदानामध्ये व्यक्त होतील. याचा आमचा पक्ष कडाडून विरोध करणार याच काहीच शंका नाही. –दिपक निकम, विधानसभा संघटक, उबाठा शिवसेना

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यासीन दाऊद आगबोटवाला रा.मु. मुशेत, पो.मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी सांगितलेवरुन दिलेल्या माहितीवरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन जाहीर नोटीस देण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे- मुशेत, ता. अलिबाग,जि. रायगड येथील गट नं. १११/अ१, एकूण क्षेत्र २२-६६-७६ हे.आर.आकार २०८.१४ रु.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-५४-१५ हे.आर. ही मिळकत.

सदर मिळकत यासीन दाऊद आगबोटवाला यांनी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे अनवर हाजी अली महमद वगैरे १२ यांचेकडून दिनांक २०-०५-१९९४ रोजी खरेदी केलेली आहे. सदर खरेदीखत हे अलिबाग येथील दु. निबंधक कार्यालयात दस्त क्र. ३९८/१९९६ अन्वये नोंदणीकृत झाले आहे.

सदर मिळकती संदर्भातील दिनांक २०-५-१९९४ रोजीचे खरेदीखत दस्त नं. ३९८/१९९६ हा मुळ दस्त यासीन दाऊद आगबोटवाला यांचेकडून वायशेत ते अलिबाग प्रवासादरम्यान दिनांक ०१-०७-२०२४ रोजी गहाळ झालेला आहे. सदर बाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे दिनांक ०५-०७-२०२४ रोजी पोलीस ठाणे गहाळ वस्तू नोंद वही क्रमांक ०५४६/२०२४ अन्वये यासीन दाऊद आगबोटवाला यांनी तक्रार दाखल केलेली आहे. तरी सदर दस्त कोणास आढळून आल्यास त्याची माहिती खाली सही करणार यांस कळवावी, ही नम्र विनंती.

अलिबाग,
तारीख :- ०७-०७-२०२४

**ॲड. संजय द. म्हात्रे**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग
रुम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-24, /24-25 RFX 7000032017 | Replacement of EHV CTs & PTs at various substations under (O&M) Circle Panvel. | Rs. 23.91 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 05.07.2024 to 12.07.2024 up to 11:00 hrs, Opening date:-12.07.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9920117819 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

निवडक

### भारताच्या जर्सीत चुक

**नवी दिल्ली :** भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील टी-२० मालिकेतील पहिला सामना ६ जुलै रोजी झाला. भारतीय संघ ८ वर्षांनंतर झिम्बाब्वे दौऱ्यावर गेला आहे. यादरम्यान भारताच्या जर्सीत मोठी चूक दिसून आली. भारतीय संघाने झिम्बाब्वेविरुद्ध त्याच डिझाईनची जर्सी घातली आहे जी त्यांनी विश्वचषकादरम्यान परिधान केली होती. खरं तर, २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताच्या नावावर आता दोन टी-२० विश्वचषक आहेत. अशा परिस्थितीत या जर्सीवर बीसीसीआयच्या लोगोवर दोन स्टार असायला हवेत, पण या जर्सीवर एकच स्टार आहे.

### भारताची शतकी भागीदारी

**नवी दिल्ली :** भारत विरूद्ध झिम्बाब्वे टी-२० मालिकेचा दुसरा सामना हरारे येथे रविवारी (दि.७) झाला. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वे समोर २३५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारतीय संघाने २० षटकात २ बाद २३४ धावा केल्या. झिम्बाब्वेविरुद्ध टी-२० क्रिकेटमध्ये केलेली ही सर्वोच्च धावसंख्या ठरली. या सामन्यात अभिषेक शर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांची जोडी जमली. या दोघांनीही शतकी भागीदारी केली. अभिषेकने १४ व्या षटकातच षटकार मारत शतक पूर्ण केले.

### द्रविडला भारतरत्न द्या!

**नवी दिल्ली :** भारतीने १७ वर्षांनी विश्वचषक जिंकला. यावेळी संपुर्ण भारतात हा क्षण उत्सवासारखा साजरा करण्यात आला. या विजयाचे शिल्पकार बरेच जणं जरी असले तरी प्रशिक्षक राहूल द्रविडचा वाटा हा यात खुप जास्त आहे. यामुळे त्याचे संपुर्ण देशात कौतूक केले जात आहे. यातच आता भारताचे माजी दिग्गड खेळाडू सुनिल गावस्करांनी सरकारने राहुल द्रविडला भारतरत्न देऊन सन्मानित करण्याची मोठी मागणी केली आहे. कारण तो एक उत्तम खेळाडू आणि कर्णधार होता. यंदा त्याने उत्तम प्रशिक्षणही केले आहे.

### जॉन सीनाची अधिकृत निवृत्ती

**कॅनडा :** वर्ल्ड रेसलिंग एंटरटेनमेंटचा स्टार जॉन सीना लवकरच आपल्या दिग्गज कारकिर्दीचा अंत करणार आहे. जॉन सीनाने डब्लूडब्लूईच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये इन-रिंग स्पर्धेतून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो २०२५ मध्ये निरोप देईल. जॉन सीना टोरंटो कॅनडात 'मनी इन द बँक' शोमध्ये परतला. त्याने अचानक एन्ट्री करून सर्व चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला. यानंतर तो म्हणाला, आज रात्री मी माझ्या निवृत्तीची अधिकृत घोषणा करत आहे.

### इंग्लंड संघाची उसळी

**नवी दिल्ली :** यावेळी पाकिस्तान आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे यजमानपद भूषवणार आहे. याबाबत पाकिस्तान बोर्डाने सामन्यांचे संपूर्ण वेळापत्रक तयार करून ते आयसीसीकडे पाठवले आहे. मात्र, आयसीसीने अद्याप याला दुजोरा दिलेला नाही. पीसीबीने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १ मार्च रोजी लाहोरमध्ये होणार आहे. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, भारताला चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यासाठी पाकिस्तानला जाणे शक्य नाही, मात्र याबाबत अद्याप फारशी चर्चा झालेली नाही.

# झिम्बॉब्वेने रचला इतिहास

**विश्वविजेत्या भारताचा पराभव | वॉशिंग्टनची झुंज अपयशी**

**। हरारे । वृत्तसंस्था ।**

भारत आणि झिम्बॉब्वे यांच्यातील शनिवारी (दि.६) झालेला पहिला टी-२० सामना रोमहर्षक झाला. झिम्बॉब्वेने विश्वविजेत्या भारताला १३ धावांनी पराभूत केले.

भारत आणि झिम्बॉब्वे यांच्यातील सामन्यांच्या मालिकेला शनिवार पासुन सुरुवात झाली. टी-२० विश्वचषक विजयानंतर भारतीय संघ हरारे स्पोर्टर्स क्लबमध्ये पहिली सामना खेळत होता. या सामन्यात झिम्बॉब्वेने भारतापुढे विजयसाठी ११६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मुझरबनी आणि चटाराने शेवटच्या दोन षटकांत केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताला १३ धावांनी पराभूत केले.



दरम्यान, भारताचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताकडून रवि बिश्नोई (४ बळी) आणि वॉशिंग्टन सुंदरने (२ बळी) दमदार गोलंदाजी केली. या दोघांनी सहा बळी घेतले. तर, वेस्ली मधेवेरे, ब्रायन बेनेट्ट, मैडेंडे आणि डायोन मायर्स यांनी चांगली फलंदाजी केली. झिम्बॉब्वेचा विकेटकीपर मैडेंडेनं २९ धावा केल्याने त्यांनी ११५ धावांपर्यंत मजल मारली. शेवटच्या पाच षटाकंत ३० धावा केल्याने झिम्बॉब्वेला यावेळी समाधानकारक धावसंख्या गाठता आली. झिम्बॉब्वेने २० षटकांत ९ गडी गमावत ११५ धावा केल्या.

झिम्बॉब्वेने भारतापुढे विजयासाठी ११६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या धावसंख्येंचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाला अभिषेक शर्माच्या रुपात पहिला धक्का बसला. अभिषेक शर्मा शुन्यावर बाद झाला. यानंतर अनुभवी खेळाडू ऋतुराज गायकवाड ७ धावा करत बाद झाला. पदार्पण करणाऱ्या रियान परागला मोठी खेळी करण्यात अपयश आले. परागला चटाराने २ धावांवर असताना बाद केले. यानंतर फलंदाजीला आलेल्या रिंकू सिंगने मोठी निराशा केली. तो शुन्यावर बाद झाला. ध्रुव जुरेल आणि शुभमन गिल डाव सावरतील असे वाटत असतानाच ध्रुव जुरेल ६ धावा करुन बाद झाला. यानंतर कर्णधार शुभमन गिल ३१ धावांवर बाद झाला. झिम्बॉब्वेच्या सिकंदर रझा, तेंदाई चटारा, ब्रायन बेनेट्ट, वेलिंग्टन मस्कदझा, ब्लेसिंग मुझरबनी, ल्यूक जोंगवे यांनी भारताच्या फलंदाजांना रोखले. सिकंदर रझानं ३ तर, चटाराने २ बळी घेतले.

## संवाद शिबिराचे आयोजन

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने बुधवारी (दि.१०) खोपोली येथील महाराजा बँक्वेट हॉल येथे सकाळी १०.३० वाजता रायगड जिल्ह्यातील सर्व अकॅडमी, क्लब व संघांच्या प्रशिक्षक आणि प्रतिनिधी यांच्या सोबत संवाद शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये २०२४-२५ च्या क्रिकेट हंगामात होणाऱ्या विविध क्रिकेट स्पर्धांचे आयोजन, स्पर्धेची रूपरेषा व नियोजन करण्याबाबत, विविध वयोगटातील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व अकॅडमी, क्लब व संघ यांचा सहभाग निश्चित करणे, जिल्ह्यातील सर्व खेळाडूंचे राजिस्ट्रेशन, स्पर्धेसाठी नियमावली तयार करणे, मुलींच्या क्रिकेट स्पर्धांचे नियोजन तसेच, रायगड जिल्ह्यात क्रिकेट वाढवण्यासाठी विविध मान्यवरांचे मार्गदर्शन व चर्चा या शिबिरामध्ये होणार आहेत.

## उरणच्या आराध्यचे ऑलिंपियाडमध्ये यश



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

आजकाल शिक्षण क्षेत्रामध्ये सगळ्या स्तरांमध्ये स्पर्धेची रस्सीखेच चालू असून, सन २०२३-२४ मध्ये झालेल्या ऑलिंपियाड परिक्षेत भारतातील २५ राज्यातील ७५० शाळांनी भाग घेतला होता. या परीक्षेत लाखो विद्यार्थी आपले नशीब आजमावत होते. त्यातूनच उरण तालुक्यातील सेंट मेरी शाळेतील इयत्ता तिसरीमधील आराध्य मयुरेश पाटील या प्रतिभाशाली विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर रिझनींग विषयात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. त्या निमित्त त्याला शाळेकडून प्रशस्तीपत्रक, ट्रॉफी व सुवर्णपदक मुख्याध्यापिका व शिक्षकांच्या हस्ते सन्मानपूर्वक देऊन सत्कार करण्यात आला. आठ वर्षाच्या आराध्यचे ज्ञान, परिश्रम व निष्ठा पाहून त्याचे उरण तालुक्यातून सर्व स्तरातून कौतुक होत आहे. मात्र, आराध्यचे परिश्रम, त्याच्या कुटुंबियांचे प्रयत्न तसेच सेंटमेरी स्कूल उरण शिक्षकांचे मागदर्शन लाभल्याने शिक्षकांचेसुद्धा अभिनंदन केले जात आहे.

## जय शहा यांची भविष्यवाणी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने २९ जून रोजी बार्बाडोसमध्ये टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद जिंकले होते, या विजयाची भविष्यवाणी काही महिन्यांपूर्वी राजकोटमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह यांनी केली होती. या मालिकेत आता जय शाह यांनी आणखी दोन अंदाज वर्तवले आहेत. बीसीसीआयचे सचिव शहा म्हणाले, रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारत आगामी दोन आयसीसी चषक जागतिक कसोटी अजिंक्यपद आणि अजिंक्यपद चषक जिंकेल. ११ वर्षांचा दुष्काळ संपवून भारताने टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले आहे. संघाने गेल्या १२ महिन्यांत तीन वेळा आयसीसी स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला, त्यापैकी दोन गमावले आहेत.

# सेहवागची 'मन की बात'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकानंतर रोहित आणि विराट यांनी टी-२० आंतराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करत चाहत्यांना मोठा धक्का दिला. यासोबतच अष्टपैलू खेळाडू रविंद्र जडेजा याने देखील टी-२० निवृत्ती जाहीर केली होती. दरम्यान, सेहवागला झिम्बाब्वेला गेलेल्या युवा खेळाडूंबद्दल विचारले असता तो म्हणाला, आंतरराष्ट्रीय निवड देशांतर्गत होते. झिम्बाब्वे दौऱ्यात कामगिरी करणारे खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यास पात्र आहे की नाही हे पाहण्याजोगे आहे. २०१० मध्ये असे होते की,



जी नवीन संघ झिम्बाब्वेविरुद्ध खेळायला जात होती ती जिंकून येत असायची. सेहवाग पुढे म्हणाला की, चांगले प्रदर्शन करणाऱ्या खेळाडूंना पुढच्या ओळीत टाकले जाते. पुढील टी-२० विश्वचषकासाठी निवडकर्ते हे लक्षात ठेवतात की कोणत्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्तरावर कशी छाप सोडली. झिम्बाब्वे, श्रीलंका आणि वेस्ट इंडिजसारख्या दौऱ्यांवर कामगिरी करुन निवृत्त झालेले खेळाडूंना टी-२० संघात घेऊ शकतात.

ऋषभ पंत, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे हे मधल्या फळीत असू शकतात. निवडकर्ते तपासतील की अव्वल ३ मध्ये कोण येऊ शकतं. रोहित आणि कोहली बाहेर पडल्यानंतर त्यांची जागा कोण घेईल, कदाचित हाच विचार करुन झिम्बाब्वे दौऱ्यासाठी या भारतीय संघाची निवड झाली असेल.

# मालिका वाचवण्याचे आवाहन

**संघाला दुखापतीचे ग्रहण**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

एकदिवसीय मालिका व एकमेव कसोटी जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाला पहिल्याच टी-२० लढतीत पराभवाला सामोरे जावे लागले हाते. भारतीय संघासमोर दुसऱ्या टी-२० लढतीत दक्षिण आफ्रिकेचे आव्हान असणार. या मालिकेतील आव्हान कायम राखण्यासाठी भारतीय संघाला या लढतीत विजय आवश्यक असून दक्षिण आफ्रिकेकडे ही मालिका जिंकण्याची सुवर्णसंधी असणार आहे. याच पार्श्वभूमीवर भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यामधील लढत रोमहर्षक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पहिल्या टी-२० लढतीमध्ये दोन्ही देशाला एक धक्का बसला. भारताची रिचा घोष व दक्षिण आफ्रिकेची ताझमिन ब्रिट्स यांना अनुक्रमे कनकशन व दुखापतीला सामोरे जावे लागले आहे. झेल पकडायला गेली असताना रिचा घोषच्या चेहऱ्याला दुखापत झाली. रिचाची दुखापत स्कॅनसाठी पाठवण्यात आली असून बीसीसीआयची वैद्यकीय समिती या दुखापतीकडे लक्ष ठेवून आहे. ताझमिन ब्रिट्स हिच्या पायाला दुखापत झाली; पण आगामी लढतींमध्ये खेळणार असल्याचे स्वत:हून तिने सांगितले. त्यामुळे सध्या तरी दक्षिण आफ्रिकेसाठी चिंतेचा विषय नाही.

दुसऱ्या सामन्यापूर्वी भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली, पहिल्या टी-२० लढतीत आम्ही चांगले क्रिकेट खेळलो नाही. क्षेत्ररक्षण करताना झेल सोडले. यामुळे २० धावांचा फटका बसला. फलंदाजी करताना निर्धाव चेंडू घालवले. दक्षिण आफ्रिकन गोलंदाजांनी अचूक टप्प्यात गोलंदाजी केली. आम्हाला धावा करण्यासाठी मोकळीक दिली नाही.



## द्रविडने उलगडले यशाचे रहस्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मुख्यप्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करीत दुसऱ्यांदा टी-२० विश्वकरंडक पटकावला. शनिवारी बीसीसीआयकडून करार संपुष्टात आलेले माजी प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा एक व्हिडीओ बीसीसीआयकडून पोस्ट करण्यात आला. त्यामध्ये राहुल द्रविड यांनी यशाचे रहस्य उलगडताना म्हटले की, मला संघामध्ये जास्त बदल करायला आवडत नाहीत. त्यामुळे अस्थिरता निर्माण होते. संघातील वातावरणावरही फरक पडतो. सुरक्षित वातावरणाला मी प्राधान्य देतो. त्यामुळे अपयशाची भीती दूर होते. खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा माझा प्रयत्न असतो. खेळामध्ये विजयाला महत्त्व आहे, पण मी कर्णधाराच्या दृष्टीला प्राधान्य देतो. प्रकियेकडे लक्ष देतो. त्यासाठी माझ्या काही बाबी निश्चित केल्या होत्या. खेळाडूंसाठी आव्हानात्मक परिस्थिती देऊ शकतो का? खेळाडूंकडून सराव करवून घेत आहोत का? तांत्रिकदृष्ट्या आपण सज्ज आहोत का? खेळाडूंना आपल्याकडून सहकार्य मिळते आहे का? आपण योग्य वातावरण निर्माण करीत आहोत का? विजयाआधी या सर्व बाबींची पूर्तता झाली का याकडे कटाक्ष टाकतो, असे राहुल द्रविड सांगतात.



# भारतीय हॉकी संघ नव्या अवतारात



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय हॉकी संघ २६ जुलैपासून सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिक २०२४ साठी तयारी करत आहे. यासाठी भारताचा १९ सदस्यीय संघ सराव सामन्यांसाठी स्वित्झर्लंडला रवाना झाला आहे. तेथे ते ऑलिम्पिकसाठी मानसिक शक्ती आणि शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी सराव करतील. संघ तेथे काही सराव सामनेही खेळणार आहे.

आता पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी भारतीय हॉकी संघाच्या अधिकृत जर्सीचे अनावरण करण्यात आले आहे. भारतीय पुरुष हॉकी संघाने ६ जुलै रोजी बंगळुरू येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण कॅम्पसमध्ये पॅरिस ऑलिम्पिकसाठी आपल्या अधिकृत जर्सीचे अनावरण केले आहे. खेळाडूंनी ऑलिम्पिक रिंगसमोर ही जर्सी परिधान करून पोझ दिली.

यावेळी संघाचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन, कर्णधार हरमनप्रीत सिंग, स्ट्रायकर मनदीप सिंग यासह इतर खेळाडू उपस्थित होते.

# विनेश फोगटची सुवर्ण कामगिरी

**। स्पेन । वृत्तसंस्था ।**

भारताची सुपरस्टार महिला कुस्तीपटू विनेश फोगट पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी फॉर्ममध्ये परतली आहे. विनेशने स्पेन ग्रांप्रीमध्ये देशाचा झेंडा फडकवला आहे. तिने या स्पर्धेत पन्नस किलो गटात सुवर्णपदक जिंकून आपल्या ऑलिम्पिकचे स्वप्न खरे करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकलेले आहे. स्पेन ग्रांप्रीच्या अंतिम फेरीमध्ये विनेशने मारिया ट्युमरकोव्हाचा १०-५ असा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. पूर्वी रशियाकडून खेळणारी मारिया आता तटस्थ खेळाडू म्हणून खेळते आहे.



तत्पूर्वी बुधवारी शेवटच्या क्षणी शेंजेन व्हिसा मिळालेल्या विनेश फोगटने तीन सामने जिंकून अंतिम फेरीत धडक मारली. विनेशने प्रथम क्युबाच्या युस्नेलिस गुझमनचा १२-४ असा पराभव केला. यानंतर तिने कॅनडाच्या मॅडिसन पार्क्सचा पराभव केला आणि उपांत्य फेरीत कॅनडाच्या केटी डर्चकचा ९-४ असा पराभव केला. यानंतर विनेश २० दिवसांच्या प्रशिक्षणासाठी फ्रान्सला जाणार आहे. पॅरिस ऑलिम्पिकचे आयोजन २६ जुलैपासून होणार आहे. या खेळांच्या महाकुंभात विनेश पदकाची प्रमुख दावेदार म्हणून उतरणार आहे.

# आशिया कपसाठी संघाची घोषणा

**कौरच्या नेतृत्वाखालील १५ खेळाडूंचा समावेश**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयने महिला आशिया चषकासाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. ही स्पर्धा १९ जुलैपासून सुरू होईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघात १५ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे.

भारताने आतापर्यंत ७ वेळा आशिया कप जिंकला आहे. यंदा भारतीय संघ आठव्यांदा कप जिंकण्याच्या इराद्याने उतरणार आहे. आशिया कपमध्ये भारतीय संघाची कमान अनुभवी हरमनप्रीत कौरच्या हाती असेल. याशिवाय दक्षिण आफ्रिके विरुद्धच्या मालिकेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्मृती मंधानाला उपकर्णधारपद देण्यात आले आहे.



कौरच्या नेतृत्वाखालील संघ गट 'अ' मध्ये आहे. भारताव्यतिरिक्त या गटात पाकिस्तान, संयुक्त अरब अमिराती आणि नेपाळचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान १९ जुलैला आमनेसामने येणार आहेत. यानंतर भारत आणि संयुक्त अरब अमिरातीचा संघ २१ जुलैला आमनेसामने येतील. तर भारत आणि नेपाळ यांच्यात २३ जुलै रोजी सामना होणार आहे.

**फ्रांस उपांत्य फेरीत दाखल**

# रोनाल्डोचे विजेतेपदाचे स्वप्न भंगले

**। हॅम्बर्ग । वृत्तसंस्था ।**

**दोन वर्षांपूर्वी विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम लढतीत अर्जेंटिनाने फ्रान्सला पेनल्टी शूटआऊटवर नमविले होते, त्या स्मृतींना तिलांजली देत फ्रेंच संघ युरो करंडकाच्या उपांत्य फेरीत दाखल झाला आहे.**



यावेळची युरो करंडक फुटबॉल स्पर्धा ३९ वर्षीय पोर्तुगीज सुपरस्टार ख्रिस्तियानो रोनाल्डोसाठी अखेरची मानली जाते, त्या पार्श्वभूमीवर निरोपाच्या स्पर्धेत विजेतेपद जिंकण्याचे त्याचे स्वप्न भंगले. दोन वेळच्या माजी विजेत्या फ्रान्सने अटीतटीच्या लढतीत निर्धारित व अतिरिक्त वेळेतील गोलशून्य बरोबरीनंतर पेनल्टी शूटआउटमध्ये पोर्तुगालला ५-३ असे नमविले. उपांत्य फेरीत आता फ्रान्ससमोर स्पेनचे आव्हान असेल. काही दिवसांपूर्वी राऊंड ऑफ १६ फेरीत पोर्तुगालने पेनल्टी शूटआऊटमध्ये स्लोव्हेनियास हरविले होते; परंतु, उपांत्यपूर्व लढतीत त्यांना फ्रान्सविरुद्ध त्या कामगिरीची पुनरावृत्ती करता आली नाही. स्लोव्हेनियाविरुद्ध विजयाचा शिल्पकार ठरलेला पोर्तुगीज गोलरक्षक दिओगो कॉस्ता यावेळी फटके अडवू शकला नाही.

### सर्वाधिक ३० सामन्यांचा मानकरी

रोनाल्डो संघात असताना पोर्तुगालने २०१६ साली युरो करंडक पटकावला होता, यंदा आणखी एका करंडकासह निरोप घेण्यासाठी तो इच्छुक होता. सहाव्यांदा युरो करंडक खेळणाऱ्या ख्रिस्तियानो रोनाल्डोचा स्पर्धेतील हा एकंदरीत ३० वा सामना ठरला. असा पराक्रम साधणारा तो पहिला फुटबॉलपटू आहे. त्याने स्पर्धेत एकूण १४ गोल नोंदविले आहेत; पण यंदा एकही गोल नोंदवू शकला नाही.

> आम्ही चांगला खेळ केला आणि कितीतरी संधी निर्माण केल्या. उत्तम वृत्ती प्रदर्शित केल्याबद्दल मला खेळाडूंचा अभिमान वाटत आहे. आम्ही विजयासाठी लायक होतो आणि हा दुःखाचा क्षण आहे, तरीही खेळाडूंना स्वत:बद्दल अभिमान वाटायला हवा. आम्ही अभिमानाने हरलो आहोत. खऱ्या पोर्तुगीज शैलीत आम्ही सर्वकाही दिले. आम्ही इथेच थांबणार नाही, भविष्यात मुसंडी मारू.
>
> – रॉबर्टो मार्टिनेझ, पोर्तुगालचे प्रशिक्षक

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)